रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक २१३ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




रायगड, मंगळवार, दि. ३१ डिसेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

### पांढरा कांदा उत्पादक चिंतेत

**अलिबाग :** तालुक्यात दरवर्षी सुमारे २५० ते ३०० हेक्टरवर पांढऱ्या कांद्याची लागवड करण्यात येते. मात्र, गेल्या दहा-बारा दिवसांपासून ढगाळ वातावरण आहे. बदलत्या हवामाना फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. अलिबाग तालुक्यातील कार्ले, खंडाळे, नेहुली, वेश्वी, वाडगाव अशा अनेक गावांतील शेतकरी पांढऱ्या कांद्याची लागवड करतात. सध्या ही लागवड अंतिम टप्प्यात असताना हवामानबदलामुळे पिकाला धोका निर्माण झाला आहे.

# बंदरांवर ‘तिसरा डोळा’

**जिल्ह्यातील 11 ठिकाणी 150 सीसीटीव्ही**



## सुरक्षेच्या दृष्टीने रायगड पोलीस अलर्ट

**प्रमोद जाधव**

**। अलिबाग ।**

मुंबई येथील २६/११च्या दहशतवादी हल्ल्यानंतर रायगड पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. जिल्ह्यातील लँडिंग व बंदरांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यामार्फत नजर ठेवण्याचे काम करण्यात आले आहे. जिल्ह्यातील अलिबाग समुद्रकिनाऱ्यासह अन्य ११ ठिकाणी १५० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. थर्टी फर्स्ट साजरा करत असताना बंदरांवर तिसऱ्या डोळ्याची नजर राहणार आहे.

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत असताना औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने जिल्ह्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. जिल्ह्यात दोन हजारांहून अधिक प्रकल्प आहेत. वेगवेगळ्या कंपन्यांतील कच्चा व पक्का माल जिल्ह्यातील वेगवेगळ्या बंदरांवर उतरविला जातो. जिल्ह्यात रस्ते वाहतुकीबरोबरच जलवाहतुकीवरदेखील भर दिला जात आहे. मांडवा बंदर व रेवस बंदर जलवाहतुकीसाठी विकसित झाले आहे. मुंबई येथील गेट-वे, भाऊचा धक्का येथून सागरी मार्गाने लाखोंच्या संख्येने पर्यटक अलिबाग, काशीद, मुरूड, नागाव, रेवदंडा, किहीम आदी समुद्रकिनारी फिरण्यास येतात. मुंबईमध्ये २६ नोव्हेंबरला झालेला दहशतवादी हल्ला हा सागरी मार्गाने येऊनच केला असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथील शेखाडी खाडीमध्ये आरडीएक्सचा साठा सापडला होता. या घटनेनंतर सागरी सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबरोबरच तपासणीवर अधिक भर देण्यात आला.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मांडवा सागरी, मुरूड, वडखळ, श्रीवर्धन, दिघी सागरी, पोयनाड, रोहा व रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लँडिंग पॉईंट व बंदरांवर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. अलिबाग •> पान २ वर

### दोन ठिकाणी कॅमेरे बंद

**रायगड पोलीस दलातील ११ ठिकाणी दीडशे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. यापैकी दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दिघी पोर्ट व अलिबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वरसोली समुद्रकिनारी प्रत्येकी एक असे दोन कॅमेरे बंद असल्याची माहिती खात्रीशीर सूत्रांकडून देण्यात आली आहे. याबाबत स्थानिक पोलिसांना विचारणा केली असता, तेदेखील या घटनेबाबत अनभिज्ञ असल्याचे समोर येत आहे.**

> “ सागरी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून जेट्टी व पोर्ट या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी कॅमेरे बंद आहेत, ते कॅमेरे सुरू करण्याच्या सूचना संबंधित विभागाला तातडीने देऊन पर्यटक व सागरी सुरक्षेवर भर दिला जाईल. ”
>
> – हनुमंत शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, दिघी सागरी पोलीस ठाणे

### रायगडला थर्टी फर्स्टची झिंग

**नवीन वर्षाची सुरूवात होण्यासाठी अवघे काही तासच उरले आहेत. यामुळे २०२४ या सरत्या वर्षाला निरोप आणि २०२५ या नववर्षाच्या स्वागतासाठी अनेकजण मोठ्या उत्साहाने तयारी करत आहे. या दिवशी दारू पिणाऱ्यांची संख्या अधिक असते. थर्टी फर्स्टनिमित्त दारूची दुकाने रात्री एक वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत. तर, पब आणि बार यांना पहाटे पाच वाजेपर्यंत मद्यविक्री करण्याची परवानगी देण्यात आली आहे. राज्य सरकारच्या आदेशानंतर येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाने आदेश काढले आहेत. जिल्ह्यात लाखो पर्यटक दाखल झाले आहेत. त्यामुळे थर्टी फर्स्टचे सेलिब्रेशन दणक्यात होणार यात दुमत नाही.**

# महामार्गावरील प्रवास जीवघेणा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील दररोजच्या लहान-मोठ्या अपघातांमध्ये प्रवाशांचे नाहक बळी जात आहेत. त्यामुळे प्रवाशांना प्रवास जीवघेणा ठरतो आहे. हा महामार्ग मृत्यूचा सापळा बनला आहे. माणगाव शहरातील दररोजच्या वाहतूक कोंडीने व्यापाऱ्यांचा व्यापार ठप्प झाले आहे. या महामार्गाच्या बाजूने चालणेदेखील मुश्किल आणि अवघड होऊन बसले आहे. याबाबत माणगावमधील नागरिक लोकप्रतिनिधींवर राग काढून तीव्र संताप व्यक्त करीत आहेत. या ज्वलंत समस्येवर तातडीने मार्ग काढून जनतेला मोकळा श्वास घेण्यासाठी उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.



- **दररोज अपघातांची मालिका सुरूच**
- **वाहतूक कोंडीने व्यापार ठप्प**
- **माणगावकरांचा तीव्र संताप**

यापूर्वी हा महामार्ग दुपदरी होता. १७ वर्षांपासून या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरू आहे. या काळात या महामार्गावर अपघातांत हजारो नाहक बळी जाऊन मृत्युमुखी पडले आहेत. अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. अनेकांचे संसार रस्त्यावर आले आहेत. त्यामुळे हा महामार्ग जीवघेणा ठरत आहे. हा महामार्ग मृत्यूचा महामार्ग म्हणून ओळखला जात आहे. त्यामुळे प्रवाशांमध्ये घबराट पसरली असून, भीतीचे वातावरण पसरले आहे. कोलाड ते लोणेरे या ३० किमी अंतरात संपूर्ण रस्ता अत्यंत खराब झाला आहे. वाहनचालकांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी फलक आणि दिशादर्शक लावले नसल्याने सातत्याने अपघात होत आहेत. पावसाळ्यात असंख्य खड्ड्यात पाणी तुंबते. त्यामुळे खड्डे दिसत नाहीत. उन्हाळ्यात धुळीचे लोट पसरत असल्याने अपघात होत असतात. मोऱ्या बांधकाम आणि उड्डाणपूल, नदीवरील पूल यांची बांधकामे सुरूच असल्याने सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. यामुळे माणगाव शहरात वाहने थांबण्यासाठी जागा किंवा वाहनतळ नसल्याने प्रवासी थांबत नाहीत. ही वाहने थांबत नसल्याने व्यावसायिकांच्या •> पान २ वर

## घाटकोपर दुर्घटनेतील आरोपीला अटक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

घाटकोपर येथील पेट्रोल पंपावर सात महिन्यांपूर्वी महाकाय होर्डिंग कोसळले होते. या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाल्याची घटना यावर्षी मे महिन्यात घडली होती. या दुर्घटनेतील आरोपी सात महिन्यांपासून फरार होता. या आरोपीला बेड्या ठोकण्यात मुंबई गुन्हे शाखेला यश आले आहे. गुन्हे शाखेने ३० डिसेंबर रोजी अरशद खान याला लखनऊ येथून अटक केली आहे. प्रकरणात यापूर्वी इगो मीडिया कंपनीचे संचालक भावेश भिंडे, कंपनीच्या माजी संचालक जान्हवी मराठे , होर्डिंगच्या देखभालीची जबाबदारी सांभाळणारे सागर पाटील आणि स्ट्रक्चरल अभियंता मनोज संघू यांना अटक करण्यात आली आहे.

## जनावरांची कत्तल करुन गोमांसाची विक्री



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नांगुर्ले गावाच्या हद्दीत रविवारी पहाटे दामखिंडी दिशेने जाणाऱ्या रस्त्यालगत निर्जनस्थळी गोवंश जनावरांची हत्या करून मांस विक्रीसाठी नेण्यात आल्याची घटना घडली आहे. यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. प्राथमिक तपासात दोन ते तीन गोवंशीय जनावरे चोरी करून या ठिकाणी आणून त्यांची हत्या करून मांस नेले गेले. गोवंश तस्करी करणाऱ्यांनी नवीन पद्धतीचा अवलंब केल्याची चर्चा सुरू असून, या घटनेची नोंद कर्जत पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. •> पान २ वर

### वे|ध|क

## आ. धसांकडून दिलगिरी व्यक्त

**बीड :** सुरेश धस यांच्याकडून प्राजक्ता माळीची दिलगिरी व्यक्त केली आहे. माझ्या वक्तव्याचा गैर अर्थ घेतला. यामुळे त्यांना हा त्रास झाला त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करत आहे, असं भाजप आमदार सुरेश धस यांनी म्हटलं आहे. अभिनेत्री प्राजक्ता माळीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. यावेळी तिने यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली होती. तसेच याआधी पत्रकार परिषदेत तिने धस यांनी आपली माफी मागावी, अशी मागणी केली होती. यानंतर आता सुरेश धस यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. मी प्राजक्ता माळींबाबत केलेल्या वक्तव्याचा वेगळा अर्थ घेतला गेला. मला त्यांचा अपमान करायचा नव्हता, असेही आ. धस म्हणाले.

## कुंभमेळ्यावर ड्रोनची नजर

**उत्तर प्रदेश :** नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारीदरम्यान होणाऱ्या महाकुंभमेळ्यासाठी सुरक्षेचे अभूतपूर्व असे अत्याधुनिक उपाय योजण्यात येत आहेत. महाकुंभमेळ्यावर ड्रोनद्वारे नजर ठेवली जाणार असून, आकाशात १२० मीटरवरून तसेच पाण्यातही १०० मीटरवर हे ड्रोन तैनात करण्यात येतील. या महाकुंभमेळ्यासाठी सुमारे ४५ कोटींपेक्षा अधिक भाविक येण्याचा अंदाज आहे. उत्तर प्रदेशात प्रथमच संगम परिसरात पाण्याखाली सुरक्षेसाठी ड्रोन तैनात केले जाणार आहेत. त्याचप्रमाणे, जगातील सर्वात मोठे धार्मिक संमेलन समजल्या जाणाऱ्या महाकुंभमेळ्यावर आकाशातूनही ड्रोनची नजर असेल, अशी माहिती आहे.

# शेतकऱ्यांचा ‘पंजाब बंद’

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

शेतकरी आपल्या मागण्यांसाठी आता आक्रमक झाले आहेत. संयुक्त किसान मोर्चा आणि किसान मजदूर मोर्चाच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. ३०) पंजाब बंदची हाक देण्यात होती. पंजाबमध्ये शेतकऱ्यांच्या बंदमुळे रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. या आंदोलनामुळे २२१ गाड्या रद्द करण्यात आल्या, तर अनेक गाड्यांचे मार्ग वळवण्यात आले आहेत. तसेच रस्ते वाहतूक आणि विमान सेवेवरही बंदचा परिणाम झाला.



- **रेल्वेसेवेवर मोठा परिणाम**
- **२२१ गाड्या रद्द**

संयुक्त किसान मोर्चा आणि किसान मजदूर मोर्चाच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी हा बंद पुकारला आहे. बंदच्या काळात वैद्यकीय सेवेसह अत्यावश्यक सेवा सुरू होत्या. पिकांसाठी एमएसपी हमी कायद्यासह १३ मागण्यांसाठी शेतकरी आक्रमक झाले आहेत. त्यासाठी सोमवारी पंजाब बंदची हाक देण्यात आली आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. पंजाबमध्ये २०० ठिकाणी रस्ते रोखण्यात आले होते. जालंधर-दिल्ली राष्ट्रीय महामार्ग आणि अमृतसर-दिल्ली महामार्गावर शेतकरी ठाण मांडून बसले होते. मोहालीत विमानतळ रस्ता रोखण्यात आला होता. पंजाबमधील मोहाली जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सुमारे ६०० पोलीस तैनात करण्यात आले होते.

एसजीपीसीसह अनेक धार्मिक आणि सामाजिक संघटनांनीही या बंदला पाठिंबा दिला आहे. पंजाब बंददरम्यान आपत्कालीन सेवा सुरू होत्या. पंजाबमधील हिवाळ्याच्या सुट्ट्यांमुळे शाळा बंद आहेत. संपामुळे पंजाब विद्यापीठाने सोमवारऐवजी मंगळवारी परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, दिल्लीमध्ये प्रवेश करण्यापासून रोखण्यात आल्यापासून संयुक्त किसान मोर्चा आणि शेतकरी मजदूर मोर्चा यांनी १३ फेब्रुवारीपासून पंजाब आणि हरयाणामधील शंभू, खनौरी बॉर्डर येथे तळ ठोकला आहे. ६ ते १४ डिसेंबरदरम्यान १०१ शेतकऱ्यांच्या एका समुहाने तीन वेळा दिल्लीकडे कूच करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, हरिणायाच्या सुरक्षा दलांनी त्यांना रोखले होते.

## विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बिहार लोकसेवा आयोगाची ७०वी पूर्व परीक्षा पूर्ण रद्द करावी यासाठी पाटणा येथे विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. जनसुराजच्या प्रशांत किशोर यांच्या नेतृत्वात सोमवारी (दि. ३०) मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाला घेराव घालण्याच्या प्रयत्नात असलेल्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी पुन्हा बेछूट लाठीचार्ज केला. येथील गांधी मैदानावर मोठ्या संख्येने विद्यार्थी जमले होते. यासाठी प्रशासनाने कोणतीही परवानगी दिली नव्हती. सायंकाळी पाच वाजता विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाकडे मोर्चा वळवला. मात्र, पोलिसांनी बॅरिकेड्स लावून त्यांना रोखले. पोलिसांच्या लाठीचार्जमध्ये अनेक विद्यार्थी जखमी झाले. विद्यार्थ्यांना घाबरून मुख्यमंत्र्यांनी दिल्ली गाठली, अशी टीका प्रशांत किशोर यांनी केली.

# विमानतळाला दिबांचे नाव कधी?

## प्रकल्पग्रस्त भूमीपुत्रांचा सरकारला सवाल

**। चाणजे । वार्ताहर ।**

नवी मुंबई, पनवेल येथे होऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर दि.२९डिसेंबर रोजी पहिले विमान उतरले. मात्र, विमान उतरले तरी अजूनपर्यंत विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाला केंद्र सरकारने मंजुरी दिली नसल्याने लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाचे काय, असा प्रश्न प्रकल्पग्रस्त भूमीपुत्रांना पडला आहे.




ज्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारले जात आहे, ते ठिकाण लोकनेते दि.बा.पाटील यांची जन्मभूमी व कर्मभूमी आहे. येथूनच ते सहा वेळा आमदार व दोन वेळा खासदार म्हणून निवडून या भागाचे लोकप्रतिनिधीत्व केले आहे. तळागाळातील उपेक्षित दुर्गम भागातील मुलांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी शाळा काढल्या, गावोगावी फिरून भात गोळा करून शिक्षकांचे पगार केले. विशेष म्हणजे, पनवेलमध्ये त्यांनी स्थापन केलेल्या महाविद्यालयात अर्ध्या रायगड जिल्ह्यातील मुलांची उच्च शिक्षणाची सोय झाली. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे ते तारणहार आहेत. साडेबारा टक्के विकसित भूखंडाचा कायदा करून तमाम प्रकल्पग्रस्तांचे कल्याण केले आहे. उद्धव ठाकरे व एकनाथ शिंदे या दोन्ही सरकारांनी औरंगाबादचे संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील नाव देण्याचा ठराव घेऊन तसा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला असून, निर्णयाचे घोंगडे भिजत पडले आहे.

**केंद्र सरकारने छत्रपती संभाजी नगर व धाराशिव या नावांना मंजुरी दिली. मात्र, लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावावर अजूनपर्यंत शिक्कामोर्तब केले नाही. यामुळे सरकारची याबाबत नेमकी भूमिका काय आहे, असा प्रश्न प्रकल्पग्रस्त भूमीपुत्रांना पडला आहे.**


## अलिबाग पोलिसांकडून तपास शून्य

# लेकीच्या वाटेकडे बापाचे डोळे

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील साखर आक्षी येथील एका १५ वर्षीय मुलीचे अपहरण होऊन एक महिना पूर्ण झाला. मात्र, अजूनपर्यंत मुलीचा शोध लागत नसल्याने बापाच्या हृदयाची धडधड वाढत आहे. आपल्या लेकीच्या वाटेकडे डोळे करीत बाप मुलीला बघण्यासाठी हंबरडा फोडत आहे. आपली मुलगी भेटेल या आशेने तो पोलीस ठाण्याचा उंबरठा झिजवत आहे.

मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविणाऱ्या प्रशांत वाडे यांची अल्पवयीन मुलगी १८ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास घरातून शाळेत निघाली. संध्याकाळ झाली तरी ती घरी आली नाही. त्यामुळे वाडे यांनी तिचा शोध घेण्यास सुरुवात केली अलिबागपासून काही अंतरावर असलेल्या एका गावातील तरुणाने तिचे अपहरण केल्याची माहिती त्यांना मिळाली. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक सौंदरमल यांच्याकडे सोपविण्यात आला.



आपली मुलगी लवकरात लवकर भेटावी म्हणून वाडे यांनी अनेक वेळा पोलीस ठाण्याचे उंबरठे झिजवले आहेत. तहान-भूक हरपून आपल्या मुलीला शोधण्याचा प्रयत्न ते गेल्या महिन्याभरापासून करीत आहेत. ज्या मुलाने तिचे अपहरण केले आहे, त्याच्या नातेवाईकांना भेटून त्यांना वारंवार विनंत्या करीत आहेत. माझ्या मुलीला एकदा तरी बघू दे अशी विनवणी केली जात आहे. मात्र, अजूनही काही थांगपत्ता लागत नसल्याची खंत बापाने व्यक्त केली आहे.

**महिना उलटून गेला तरी पोलीस अद्याप अपहरण झालेल्या मुलीचा शोध लावू शकलेले नाहीत. त्यामुळे संताप व्यक्त होत आहे. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.**

पंधरा वर्षांच्या शाळकरी अल्पवयीन मुलीचे अपहरण होऊन एक महिना पूर्ण झाला आहे. तरीसुद्धा मुलगी सापडत नसल्याने बापाला चिंता पडली आहे. आपली मुलगी कुठे आहे, काय करत असेल, काही खाल्ले असेल का, असे अनेक प्रकारचे प्रश्न बापासमोर उभे राहात आहे. आपल्या मुलीला भेटण्यासाठी बाप हंबरडा फोडत आहे. पण, त्याच्या या हंबरड्याकडे पोलिसांकडून लक्षच दिले जात नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. अन्यथा मुलीसाठी पोलीस ठाण्यासमोर उपोषण केले जाईल, असा इशारा त्याने दिला आहे.

# केरळ मिनी पाकिस्तान

## मंत्री नितेश राणेंचे वादग्रस्त वक्तव्य

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



केरळ हा मिनी पाकिस्तान आहे. त्यामुळे राहुल गांधी आणि त्यांची बहीण (प्रियांका गांधी) तिथून निवडणूक जिंकत आहेत. सर्व अतिरेकी त्यांना मतदान करतात. अतिरेक्यांच्या मतांमुळेच ते खासदार झाले आहेत, असे आक्षेपार्ह वक्तव्य बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी केले आहे. सोमवारी पुणे जिल्ह्यातील सासवड येथे ते बोलत होते.

नितेश राणे म्हणाले की, महाराष्ट्रात आता हिंदुत्वाचे सरकार आहे. जो कायदा अन्य धर्मियांना लागतो, तोच कायदा हिंदू धर्माला लागतो. कायद्याच्या चौकटीत सर्व कामे हेच आम्हाला अपेक्षित आहे. अफजल खान वधाचा पोस्टर तुम्ही लावू नका, यातून भावना दुखवतील, असेस्थानिकप्रशासनाकडूनसांगण्यात आले. परंतु, ज्या देशात ८५ टक्के हिंदू राहतात, आमच्या नसानसात छत्रपती शिवाजी महाराज आहेत. महाराष्ट्रात आम्ही अफजलखानाच्या वधाचे पोस्टर लावायचे नाहीत? मग पाकिस्तानमध्ये लावायचे का, असा प्रश्न राणे यांनी उपस्थित केला.

नितेश राणे यांच्या मिनी पाकिस्तान या वादग्रस्त विधानानंतर विरोधी पक्षांच्या नेत्यांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. यानंतर राणे यांनी केरळ हा भारताचाच •> पान २ वर

# सत्याग्रहाचा संकल्प करावा : बाबा आढाव

## ■ अंनिसच्या अधिवेशन उद्घाटनप्रसंगी कार्यकर्त्यांना संबोधित

**। पुणे । प्रतिनिधी ।**

**सत्य जाणीवपूर्वक झाकून टाकण्याच्या काळात सत्याग्रहाच्या मार्गानेच समाज परिवर्तन होऊ शकते. त्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सारख्या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सत्याग्रह करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन ज्येष्ठ सम ाजवादी व कामगार नेते बाबा आढाव यांनी केले.**




शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि विवेक जागर संस्था आयोजित ३५ वर्षपूर्तीनिमित्त राज्य अधिवेशनाचे पुण्यातील संतभूमी आळंदी येथे उद्घाटन झाले. यावेळी ते बोलत होते.

त्यावेळी अध्यक्षस्थानी अंनिसचे राज्य अध्यक्ष अविनाश पाटील, कार्याध्यक्ष माधव बावगे, ज्येष्ठ कार्यकर्ते बाबा आरगडे, राज्य उपाध्यक्ष डॉ. प्रदीप जोशी, प्रधान सचिव ठकसेन गोराणे, संजय बनसोडे, गजेंद्र सुरकार, प्रा. परेश शहा, संपादक उत्तम जोगदंड यांच्यासह अंनिस राज्य कार्यकारी समितीचे सरचिटणीस आदी उपस्थित होते. याप्रसंगी बाबा आढाव म्हणाले की, आपण सारे एकच संविधान परिवारातील आहोत.

### परिसंवादातून वैचारिक मेजवानी

वर्षपूर्ती अधिवेशनाच्या निमित्ताने राज्य अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी 'मनस्वास्थ्य ते समाजस्वास्थ्य' या विषयावर प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ प्रदीप जोशी, डॉ. अनिल डोंगरे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. प्रदीप पाटकर यांनी परिसंवादाच्या अध्यक्षीय समारोपात समाजात आजही विषमता, सांस्कृतिक दहशतवाद, हिंसा या आव्हानांच्या विरोधात आपल्याला लढावे लागेल, नव्या अंधश्रद्धा निर्माण होत असून, आपले काम संपत नसल्याचे सांगितले. 'वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आजची आव्हाने' या दुसऱ्या परिसंवादात उत्तम जोगदंड, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे यांनी फलज्योतिष, सुडो सायन्स, वास्तुशास्त्र, तंत्रज्ञानाच्या वापराने निर्माण होणाऱ्या अंधश्रद्धा याबद्दल वैचारिक मांडणी केली. डॉ.पंडित विद्यासागर यांनी जगाकडे पाहण्याच्या वैज्ञानिक दृष्टिकोन आपण विकसित केला पाहिजे आणि ते आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान असल्याचे परिसंवादाच्या समोर प्रसंगी सांगितले.

# अलिबागेत शासनमान्य ग्रंथपालन प्रमाण वर्ग

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा ग्रंथालय संघ यांचे संयुक्त विद्यमाने आणि सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय अलिबाग यांचे सहकार्याने दि. १ जानेवारी ते दि. ३० जून २०२५ या कालावधीत महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त वर्ग जे.एस.एम. कॉलेज, अलिबाग येथे आयोजित करण्यात आला आहे.

हा वर्ग सहा महिने चालविण्यात येणार आहे. दर शनिवार व रविवार वर्ग सुरू राहील. या वर्गासाठी बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. रायगड जिल्हा ग्रंथालय संघातर्फे गेली ३५ वर्षे हा ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग चालविला जात आहे. या वर्गामुळे जिल्ह्यातील बहुसंख्य बेरोजगार तरुणांना शाळा महाविद्यालये, ग्रंथालये आणि शासकीय सेवेत नोकरी उपलब्ध झाली आहे.

या वर्गासाठी प्रवेश घेणाऱ्यांनी सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय अलिबाग, डोंगरे हॉल येथे वर्गाचे व्यवस्थापक व जिल्हा ग्रंथालयाचे ग्रंथपाल भालचंद्र वर्तक (९९२१५५१९५२) आणि सहाय्यक ग्रंथपाल रजिता माळवी (८८०५७१६५१२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोंदार्डे, प्रमुख कार्यवाह तुकाराम पवार आणि जिल्हा ग्रंथालय अलिबागचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील व कार्याध्यक्षा शैला पाटील यांनी केले आहे.

# कवी पुंडलिक म्हात्रेंचा सन्मान

**। चिरनेर। प्रतिनिधी ।**



पारस काव्य कला जनजागृती संस्था नवी मुंबईच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चौदाव्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रसिद्ध आगरी कवी पुंडलिक म्हात्रे यांना पारस काव्य कला जनजागृती संस्थेच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा जागतिक कीर्तीचा कवी पुरस्कार, समारंभपूर्वक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

सदर कार्यक्रम शनिवार (दि.२८) डिसेंबर रोजी बाबासाहेब आंबेडकर समता भवन सेक्टर १० सानपाडा, जुईनगर रेल्वे स्टेशन (पश्चिम) नवी मुंबई येथे दुपारी दीड वाजता पार पडला. यावेळी त्यांना संस्थापक अध्यक्ष मंगेश चांदीवडे यांच्या हस्ते आणि विश्वभूषण पुरस्काराचे मानकरी संजय बर्वे, प्रा. सुनील चव्हाण, विजय शिरढोणकर, श्री नेवरेकर, कवी शंकर गोपाळे, खजिनदार शोभा चांदिवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. मुंबई विद्यापीठाच्या एसवायबीए मराठीच्या पुस्तकात पुंडलिक म्हात्रे यांच्या दोन कवितांचा समावेश असल्याचा उल्लेख मान्यवरांनी यावेळी केला. तसेच दहाव्या राज्यस्तरीय आगरी साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले असल्याचे सांगून, आगरी बोलीतील कवितांमधून अत्यंत पोटतिडकीने प्रकल्पग्रस्तांच्या व्यथा मांडणारा कवी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. आगरी कवितांचे बादशहा अशी त्यांच्या नावाची ख्याती असल्याचा उल्लेख अनेकांनी आपल्या भाषणातून केला. 'हरकत काय तुमची' हा त्यांचा काव्यसंग्रह असून, प्रकल्पग्रस्तांच्या व्यथा मांडणारा हा काव्यसंग्रह समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालत आहे. जर्मनी व ऑस्ट्रेलिया कॅम्प या कंपनीद्वारे २७ एप्रिल २०२३ रोजी इन्कुरी, सपान, आणि म आम्ही कोणाचं नाय खात या तीन आगरी बोलीतील कवितांचे अनेक भाषेतून २५ ते ३० देशात लाईव्ह प्रसारण झाले असून, भारतातील एकमेव आगरी कवी म्हणून त्यांना सन्मानपत्र व रोख रक्कम देऊन त्यांच्याच उलवे येथील जन्मभूमीत १७ जून २०२३ रोजी त्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले आहे.

# घरातून सोन्याची रिंग आणि कड्याची चोरी

**नवीन पनवेल :** करंजाडे येथील घरात येऊन अनोळखी इसमाने ७६ हजार रुपये किमतीचे सोन्याची रिंग आणि सोन्याचा कडा चोरल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सेक्टर आर फोर, करंजाडे येथे राहणाऱ्या फिर्यादी यांनी टेबलवर सोन्याची रिंग आणि सोन्याचा कडा ठेवला होता. २६ डिसेंबर रोजी दुपारी पावणेदोनच्या सुमारास त्यांनी रिंग आणि कडा पाहिले असता त्यांना ते दिसून आले नाही. अनोळखी इसमाने ते चोरून नेले.

## पान १ वरून

पान १ वरून

### बंदरांवर 'तिसरा डोळा'

समुद्रकिनारा वरसोली समुद्रकिनारा, रेवस बंदर, रेवस पकटी, मांडवा बंदर, आगरदांडा प्रवासी वाहतूक जंगल जेट्टी, राजपूरी, धरमतर जेट्टी, धरमतर पोर्ट, बागमांडला जेट्टी, दिघी प्रवासी जेट्टी, दिघी पोर्ट, सानेगाव जेट्टी, पीएनपी जेट्टी, सानेगाव जेट्टी, जेएसडब्ल्यू जेट्टी अशा ११ ठिकाणी दीडशे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. स्थानिक व पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हे कॅमेरे लावण्यात आले आहेत. सागरी किनारी रात्रीच्यावेळी संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्याचे काम सीसीटीव्ही कॅमेरे करीत आहेत. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपासून सागरी सुरक्षा भक्कम करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, आजही जिल्ह्यातील काही बंदरांवरून डिझेलतस्करी मध्यरात्रीच्या सुमारात होत आहे. डिझेलमाफियांविरोधात कारवाई करूनदेखील ही तस्करी केली जात आहे. याकडे पोलिसांनी लक्ष द्यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते करीत आहेत.

जिल्ह्यात सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी पर्यटक दाखल झाले आहेत. किनाऱ्यांसह वेगवेगळ्या सार्वजनिक ठिकाणी पर्यटकांची वर्दळ वाढू लागली आहे. वेगवेगळ्या ठिकाणी लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे संशयित हालचालींवर लक्ष ठेवला जाणार आहे. त्यामुळे गैरप्रकार करणाऱ्यांवर तिसऱ्या डोळ्याची नजर असणार आहे.

### महामार्गावरील प्रवास जीवघेणा

व्यवसायावर दुष्परिणाम होत असून, व्यापार ठप्प झाला आहे. रस्त्यावर चालणेदेखील मुश्किल झाले आहे. त्यामुळे गिऱ्हाईकदेखील दुकानात येत नाही, अशा तक्रारी व्यापारी करीत आहेत.

माणगाव शहरातील महामार्गाचे रुंदीकरण किंवा चौपदरीकरण झाले नाही. हातगाड्या आणि टपरीधारक यांनी महामार्ग व्यापून टाकल्याने रहदारीचला अडथळा निर्माण झाला आहे. सर्व्हिस रोड आणि बायपास रस्ता नसल्याने शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी होत आहे. कचेरी मार्ग, मोर्बा मार्ग, निजामपूर मार्ग आणि बामणोली या मार्गावर दररोज वाहतूक कोंडी होत असते. वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी पोलिसांची कमतरता आहे. याचाही परिणाम वाहतूक कोंडीवर होत आहे. या वाहतूक कोंडीने माणगाव शहर वाहतूक कोंडीचे शहर म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात बदनाम होत आहे.

माणगाव शहरात वाहन आल्यावर ते एक ते दोन तास अडकून पडते. त्यामुळे प्रवाशांचा नाहक वेळ वाया जातो. या कारणांमुळे काही प्रवासी पूणे आणि कोल्हापूरमार्गे कोकणात जातात. त्यामुळे येथील बायपासचे काम तातडीने सुरू होणे अत्यंत आवश्यक आहे. ही माणगाव शहरातील वाहतुकीची कोंडी तात्पुरती दूर करण्यासाठी पोलिसांनी २५ डिसेंबर ते २ जानेवारी या आठ दिवसांसाठी वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत. मात्र, त्यांना यश मिळाले नाही. हा सुट्ट्यांचा हंगाम आणि काळ असल्याने मोठ्या प्रमाणावर कोकणातील निसर्गरम्य स्थळे पाहण्यासाठी दररोज हजारो पर्यटक येत आहेत. कोकणात आणि श्रीवर्धन येथे जाण्यासाठी एकच मार्ग हा माणगाव शहरातून आहे. येथील बायपासचे काम तातडीने झाल्यास माणगाव शहरातील वाहतुकीच्या कोंडीतून प्रवासी आणि माणगावमधील नागरिकांची सुटका होईल, असा दावा प्रवासी संघटनेने केला आहे.

### जनावरांची कत्तल करुन गोमांसाची विक्री

कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील नांगुर्ले येथील जंगलात मृत जनावरे आढळून आल्याची माहिती कर्जत पोलिसांना मिळाली होती. कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक गायकवाड आणि त्यांचे पथक तात्काळ पोहोचले. सध्या पोलीस या घटनेचा सखोल तपास करत आहेत. बोकड आणि मेंढा यांचे मांस हे बाजारात तुलनेने महाग मिळते असते. त्यात गोवंशीय मांस २०० रुपये किलोने स्वस्तात विकल्याने हे मांस हॉटेल व्यवसायमध्ये आणि खाण्यासाठी विक्रीसाठी पाठवले जात आहे. नवी मुंबई, मुंब्रा, ठाणे, पनवेल ठिकाणी हे मांस वाहनातून कापून छुप्या पद्धतीने नेत असल्याचे समोर असताना आता चक्क नवीन वर्षाच्या स्वागताला कर्जत तालुक्यात गोवंशीय जनावरांची कत्तल केल्याचे समोर आल्याने याचे मांस विक्रीसाठी गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. यावर गोरक्षकांनी घटनेचा पोलिसांनी कसून तपास करून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी होत आहे.

### केरळ मिनी पाकिस्तान

भाग असल्याचे म्हणत घुमजाव केले. मी फक्त केरळ आणि पाकिस्तानमधील परिस्थितीची तुलना करत होतो. आमचा देश, जो हिंदु राष्ट्र आहे, ते हिंदु राष्ट्रच राहावे, अशी आमची इच्छा आहे. हिंदूंचे सर्व प्रकारे संरक्षण केले पाहिजे. केरळ हा भारताचाच भाग आहे. तथापि, हिंदूंची घटती लोकसंख्या ही प्रत्येकाने काळजी करायला हवी. हिंदूंचे मुस्लिम आणि ख्रिश्चनमध्ये धर्मांतर करणे ही तिथली रोजची गोष्ट बनली आहे. लव्ह जिहादची प्रकरणे घडत असून, हिंदू महिलांना टार्गेट केले जात आहे. तेच मी माझ्या भाषणात सांगण्याचा प्रयत्न करत होतो, असे राणे म्हणाले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस

सर्व १) केशव काळुराम देशमुख २) नंदकुमार काळुराम देशमुख ३) महेश्वर काळुराम देशमुख ४) नरेंद्र काळुराम देशमुख ५) भाविक दत्तात्रेय देशमुख ६) विदया दत्तात्रेय देशमुख, राहणार - गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. महाविर इन्फ्राकॉन तर्फे भागीदार **१. अंकित धनसुखलाल जैन २. अरिहंत रमेश कोठारी ३. देवेंद्र ओस्तवाल ४. वतनकुमार शांतीलाल भगत** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३९२६ | १६.१२.२०२४ | पुष्पक | २६ | ८० | ४३०चौ.मी. | २७.०९.२०२४ | २८.१०.२०२४ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३७४/२०२४-२५



## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय: हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, प्रभादेवी, मुंबई-४०००१३.
दूरध्वनी क्र. ०२२ - ६९३२८१११/ ६९३२८१८१
E-mail: mlwbconteeg@gmail.com, संकेतस्थळ: www.public.mlwb.in

### नोटीस

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये नोटीस देण्यात येते की, खाली दर्शविलेल्या आस्थापना/ संस्थांमधील कामगार/ कर्मचाऱ्यांच्या **दिनांक ३० जून २०२१** पर्यंतच्या पगार, बोनस वगैरेसारख्या अवितरीत संचयनाच्या रकमा त्यांना न दिल्या गेल्याने मंडळाकडे **दिनांक ३० सप्टेंबर २०२४** पर्यंत जमा झालेल्या आहेत. अशा व्यक्तींच्या नावांची यादी इत्यादी तपशील महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३)(अ) अन्वये संबंधित आस्थापनेच्या/संस्थेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावा. संबंधित व्यक्तींना सदर रकमेचा परतावा मिळण्यासाठी त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता, आस्थापना/संस्थेचे नाव व पत्ता, तिकीट नंबर, हुद्दा व कोणत्या महिन्याची व वर्षाची रक्कम आहे इत्यादी तपशील देऊन आपल्या आस्थापनेच्या शिफारस पत्रासह कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्याकडे वरील पत्यावर दोन प्रतीत अर्ज सादर करावा.

| आस्थापनेचे नांव | रक्कम |
|---|---|
| रायगड | रुपये पैसे |
| EXIDE INDUSTRIES LTD. | 216066.00 |
| HUHTAMAKI INDIA LTD | 512405.00 |
| HUHTAMAKI INDIA LIMITED | 387361.00 |
| ASAHI INDIA GLASS LTD | 640246.00 |

स्वाक्षरीत/-
कल्याण आयुक्त
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

उपरोक्त जाहीर केलेल्या अवितरीत संचयनाच्या न दिल्या गेलेल्या पगार वगैरे सारख्या रकमांमध्ये मंडळाकडे **दिनांक ३० सप्टेंबर २०२१** पर्यंत जमा झालेल्या आणि मागील सलग तीन वर्ष नोटीसीद्वारे जाहीर केलेल्या रकमांचा महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये समावेश करण्यात आलेला नाही. तसेच या रकमांमध्ये **दिनांक १.१०.२०२१ ते ३०.०९.२०२४** या तीन वर्षाच्या कालावधीत मंडळाकडे जमा झालेल्या सर्व रकमांचा समावेश करण्यात आलेला आहे.



## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### खुल्या ई-निविदा आमंत्रित करण्याची सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, प्रादेशिक विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांच्या वतीने पुढील कामासाठी ई-खुल्या निविदा मागविण्यात येत आहेत: **कामाचे नाव:** कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागात नातूवाडी बोगद्याच्या आत पुरवठा, वाहतूक, उभारणी, चाचणी आणि चालू करणे यासह विद्यमान 3.3 केव्ही, 630 ए, इनडोअर व्हीसीबी पॅनेल बदलणे. **निविदा क्रमांक:** केआर/ आरएन/ईएल/टी/21/2024 **दिनांक** 31/12/2024. **अंदाजे खर्च:** ₹ 7,36,580/- (जीएसटी वगळून). **निविदा फॉर्मची किंमत:** शून्य. **ईएमडी:** ₹ 14,700/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे). ऑनलाईन निविदा जमा करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: **21/01/2025, 15:00 वाजेपर्यंत**. अधिक तपशिलांसाठी, प्रादेशिक विद्युत अभियंता कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी किंवा रेल्वेच्या वेबसाइटवर **(www.ireps.gov.in)** संपर्क साधा.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे मानिवली, ता. कर्जत, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १)श्रीम.शांताबाई वाळकू डायरे<br>२)श्रीम.जिजाबाई काशिनाथ बदे<br>३) श्री.संतोष नामदेव गवळी<br>४) श्रीम.सविता अरविंद दळवी<br>५) श्रीम.शारदा जयवंत बदे | ३३/७/अ | ०-१६-२० | १-५६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ३१/१२/२०२४
खरेदी घेणार - **श्री. ललीत सदानंद गंध्रे**
रा. नेरळ जुनी बाजारपेठ, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो. नंबर ८०८७५३०७०७

सही/-
खरेदीदारांचे लेखक,
राठोड एण्ड एसोसिएट्स
श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,
श्री. राजेश एस. राठोड
२८६अ राठोड सदन ऑफिस नं.७ पाली,
ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०



## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे परहूर व मौजे परहूरपाडा, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती, मिळकतींचे विद्यमान मालक १. राजेंद्र शांताराम गावंड, २. संगिता राजेंद्र गावंड यांचेकडून विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरच्या मिळकती निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | परहूर, ता.अलिबाग जि. रायगड | १०/१ | क्षेत्र ०.१९.८०<br>पो.ख. ०.०३.५०<br>०.२३.३० | २.८१ |
| २ | परहूर, ता.अलिबाग जि. रायगड | ११/१ | क्षेत्र ०.१४.१०<br>पो.ख. ०.०१.९०<br>०.१६.०० | ३.५४ |
| ३ | परहूर, ता.अलिबाग जि. रायगड | १०/२ | क्षेत्र ०.१७.३०<br>पो.ख. ०.०१.१०<br>०.१८.४० | ४.४६ |
| ४ | परहूरपाडा, ता.अलिबाग जि. रायगड | १६ | क्षेत्र ०.१२.३०<br>पो.ख. ०.०१.२०<br>०.१३.५० | २.८६ |

अ.क्र. ४ या मिळकतीमधील ग्रामपंचायत परहूर घर नं. २०७ या सह

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमीच्या आहेत. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचे खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ३१/१२/२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०



## जाहीर समन्स

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांच्या कोर्टात.**

रे.मु.नं.१६४/२०२४

१) श्री.संजयकुमार वासूदेव पाटील
वय,५९ वर्षे: धंदा : शेती
३०४,श्री दर्शन सोसायटी,
एम,आय, डी, सी, मिलाप नगर,
डोबिंवली(ईस्ट) कल्याण, ठाणे
२) श्री. विवेककुमार वासूदेव पाटील
वय,५३ वर्षे: धंदा : नोकरी
बी/३, अंबरशांतीयोग,
को, सो. अंबरयोग कॉम्प्लेक्स, बायरे. — वादी
रोड,लक्ष्मण रेखा डोंबीवली पूर्व, कल्याण, ठाणे
३) सौ. सुप्रिया सुरेश पाटील
वय,६७ वर्षे: धंदा: शेती
सुप्रिया अपार्टमेंट, अमराई,
विजय नगर कल्याण पूर्व ठाणे
कल्याण,

**विरूद्ध**

१) श्री. अशोक गणू ठाकूर ,
वय ५५ वर्षे: धंदा : शेती
२) श्री. नरेश गणू ठाकूर
वय, ५७ वर्षे: धंदा:शेती
३) श्री. प्रकाश गणू ठाकूर
वय, ४८ वर्षे: धंदा:शेती
४) श्री.जयवंत गणू ठाकूर
वय, ५० वर्षे: धंदा : शेती
५) श्री. कैलास गणू ठाकूर
वय, ५२ वर्षे: धंदा : शेती
६) सौ. कल्पना गणू ठाकूर — -प्रतिवादी
वय, ५२ वर्षे: धंदा : गृहीणी
७) सौ. शोभा राजेंद्र पाटील
वय: ४८ वर्षे, धंदा : गृहीणी
वरील प्रतिवादी क्र.१ ते ७
रा: फोफेरी, ता. अलिबाग,
जि. रायगड, पिन४०२२०९
८) श्री. विजयकुमार वासूदेव पाटील
वय,६१ वर्षे: धंदा:
१६,ओम मंगळमुर्ती, को.ऑप,हाउसिंग
सोसायटी, पेस्टम सागर,
रोड नं. ४, चेंबुर मुंबई पिन. ४०००८१
९) सौ. विणा प्रमोद पाटील.
वय, ५८ वर्षे: धंदा : गृहीणी
मिथुल एनक्लेव, को.सो,
जिजामाता नगर मैसूर
कॉलनी चेंबूर मंबई ४०००७४
१०) सौ. पोर्णिमा घनश्याम म्हात्रे (मयत)तर्फे वारस. — प्रतिवादी
१०/१) श्री. अव्यग्र घनश्याम म्हात्रे
वय, २० वर्षे: धंदा :
१०/२) श्री. अनुष्का घनश्याम म्हात्रे
वय, २२ वर्षे: धंदा:
रा: सरोवर दर्शन प्लॉट नं. ४०२,
कचराआळी तळाव ठाणे, पश्चिम जि: ठाणे

वादी श्री. संजयकुमार वासूदेव पाटील व इतर यांनी यांच्या विरूद्ध स्पेसिफीक रिलीफ ॲक्ट चे कलम ३४ प्रमाणे दावा हक्क प्रस्थापणेकरीता व ३७ प्रमाणे मनाई हुकुमाकरीता अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांच्या कोर्टात. रे.मु.नं.१६४/२०२४. दाखल केला आहे. सदर दाव्याकामी में. कोर्टाच्या आदेशानुसार प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना बेलीफामार्फत व रजिस्टर्ड पोस्टाने सदर दाव्याकामी हजर राहण्यासाठी सदर दाव्यातील तुमच्या पत्त्यावर समन्स व नोटीसेस पाठवण्यात आली आहे. परंतू सदर जागेवर सध्या तुम्ही राहत नाही व आता कुठे राहत आहेत हे माहीत नाही तसेच सदर अलिबाग भरपुर मोठा असुन तेथे ठिकठिकाणी शोध घेतला असता व विचारले असता प्रतिवादी नावाची माणसे कोठे राहतात हे तेथिल लोकांना माहीत नाही. असे बेलीफ रिपोर्ट वरून दिसत आहे.

तरी तुम्हास कळविण्यात येत आहे की, तुम्हास सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ५ म्हणून तुम्हाला पक्षकार करण्यात आले आहे. सदर दाव्याविरूध्द तुम्हाला तुमचे म्हणने व कैफियत दाखल करण्याकरीता दिनांक: १४/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रीतसर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर रहावे, सदर दाव्याकामी हजर होवून दाव्याची सुनावणी पुढे सुरू होण्यासाठी या वादीस मदत करावी. तुम्ही तसे न केल्यास तुमच्या विरूद्ध पुढील आदेश होवून मिळणेकरीता वादीतर्फे में. कोर्टात अर्ज करून तुमच्या विरूद्ध पुढील कार्यवाही करण्यात येईल हे कळावे.

आज दिनांक.३०/१२/२०२४ माझ्या सही शिक्यानीशी प्रसिद्ध केले.

अलिबाग:
दिनांक :३०/१२/२०२४

सही/-
**न्यायालयीन लिपीक अलिबाग**

# सुस्ती आणि मस्ती

विधानसभा निवडणुकांचे निकाल २३ नोव्हेंबरला लागले. मुख्यमंत्री ठरवण्यात दहा दिवस, मंत्री ठरवण्यात पुढचे दहा दिवस आणि त्यांचे खातेवाटप करण्यात आणखी दहा दिवस असा वेळ काढला गेला. कहर म्हणजे आता खातेवाटप होऊनही दोन आठवडे होत आले तरी अठरा मंत्र्यांनी आपला पदभारच स्वीकारलेला नाही असे उघड झाले आहे. त्यात आपल्या रायगडचे भूमिपुत्र श्रीमान भरत गोगावले यांचाही समावेश होता. त्यापूर्वी एकनाथ शिंदे यांच्या काळात मंत्रिपदाच्या बोहल्यावर चढायला भरतशेठ गुढघ्याला बाशिंग बांधून तयार होते. सतत शिंदे यांच्या आजूबाजूला करत होते. त्यांनी खास कोट शिवून घेतला होता. देवदेवतांना नवस केले होते. नवरात्रात उपासतापासही केले होते असे म्हणतात. तो शिवलेला कोट घालण्यापुरते तरी शेठना मंत्री करा असे अजितदादा म्हणत होते. इतके करूनही मंत्रिपद मिळेना तेव्हा आपल्याला बाजूला करून मंत्रिपद कसे ढापले त्याचे किस्से त्यांनी सांगितले. यंदा पहिल्याच फेरीत गोगावलेंना मंत्रिपद मिळाल्याने आता तरी ते जोरात कामाला सुरूवात करतील अशी अपेक्षा होती. पण त्यांनी एक जानेवारीपासून पद ग्रहण करणार आहे असे सांगितले. त्यांना रोजगार हमी व फलोत्पादन अशी खाती मिळाली आहेत. गोगावले त्यावरूनही नाराज आहेत अशा बातम्या होत्या. वास्तविक ग्रामीण महाराष्ट्रासाठी ही अत्यंत महत्वाची खाती आहेत. शरद पवार यांनी मुख्यमंत्री असताना राज्यात फलोत्पादन क्रांती घडवली. आज कोकणात आंब्याचे, तसेच देशावर डाळिंब, पेरू, द्राक्षे इत्यादींचे जे अर्थकारण उभे राहिले आहे ते पवारांचे कर्तृत्व आहे. त्याचा पुढचा टप्पा गाठण्यासाठी हे खाते अत्यंत महत्वाचे ठरू शकते. कोकणात आंब्यासोबतच इतर फळांच्या उत्पादनाला गती देण्याचे काम गोगावले करू शकतात. मात्र सध्या तरी या आघाडीवर एकदम शांतता दिसते आहे. सरकार आहे तरी कुठे असा प्रश्न मंत्रालयातील अधिकाऱ्यांनाही पडला आहे.

## सुट्ट्या, परदेशवाऱ्या

आरोग्यमंत्री कोल्हापूरचे प्रकाश आबिटकर, माहिती तंत्रज्ञानमंत्री आशिष शेलार, पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील, शालेय शिक्षणवाले दादा भुसे अशी पदभार न स्वीकारणाऱ्या इतर मंत्र्यांची नावे असल्याचे प्रसिध्द झाले आहे. याबाबत आता घाईघाईने खुलासे होतील व आपण कामाला सुरुवात केली आहे असेही सांगितले जाईल. पण त्याला काही अर्थ नाही. निवडणुकीनंतर आमचेच सरकार येणार व पहिल्या शंभर दिवसांचा कार्यक्रम आम्ही आखतो आहोत असे देवेंद्र फडणवीस पूर्वी म्हणाले होते. पण तो कार्यक्रम प्रत्यक्षात आलेला नाही. याच प्रकारची घोषणा नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वी केली होती. पण भाजपच्या जागा ३०३ वरून २४० वर आल्यानंतर मोदींनी या कार्यक्रमाबाबत अवाक्षरही काढलेले नाही. याचे कोणतेही स्पष्टीकरण देखील त्यांनी दिलेले नाही. महाराष्ट्रात नेमका उलटा प्रकार चालू आहे. निवडणुकीत विरोधकांचे पानिपत होऊन केवळ ४९ जागा मिळाल्या. त्यामुळे आपल्याला कोणी विरोधकच उरलेला नाही अशा भावनेने देवेंद्रांच्या सरकारात ही सुस्ती आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गेल्या आठवड्यात दिल्लीत पंतप्रधानांना सहकुटुंब भेटले व नंतर काश्मीरला सुट्टी साजरी करायला निघून गेले. त्याहीपूर्वी शिंद्यांनी नाराज असल्याने गावच्या शेतावर बरेच दिवस काढले होते. आपण कसे काम करणारे नेते आहोत व दिवसरात्र काम करतो असे सांगणाऱ्या शिंद्यांचा उत्साह मुख्यमंत्रिपद गेल्यावर संपलेला दिसतो. दुसरीकडे संतोष देशमुख प्रकरणातील टीकेमुळे अजित पवार, धनंजय मुंडे व राष्ट्रवादीचे बाकीचे नेते बिळात लपले आहेत. दादा गटाचे दत्तात्रय भरणे हे तर परदेशात सुट्टीवर गेले असल्याच्या बातम्या आहेत. म्हणजे पद पदरात पाडून घेतल्यावर मंत्री लोक गायब झाल्याचे चित्र आहे. एरवी आमदार झाल्यावर हेच लोक पाच वर्षे मतदारसंघातील समस्यांची पर्वा करीत नसतात. आता मंत्री झाल्यावरही हाच क्रम चालू आहे. मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र काय करीत आहेत हाही प्रश्नच आहे.

## रामभरोसे कारभार

महायुतीचे सरकार आल्या आल्या परभणीमध्ये दलित कार्यकर्त्यांचे मृत्यू झाले. त्याने समाजात असंतोष आहे. बीडमध्ये संतोष देशमुख हत्या प्रकरण होऊन वीस दिवस झाले तरीही पोलिसांना आरोपी सापडलेला नाही. कल्याणमध्ये एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिचा खून झाला. या प्रकरणातील आरोपी भाजपचा कार्यकर्ता असल्याचा आरोप होत आहे. ते खरे असो किंवा नसो, पण त्या आरोपीचे पूर्वचरित्र लक्षात घेता पोलिसांनी पूर्वीच कडक कारवाई करायला हवी होती हे स्पष्ट आहे. बदलापूरच्या अत्याचार प्रकरणात संस्थाचालकांना बऱ्याच उशिरा अटक झाली. पण त्यांना शिक्षा होईलच असा भरवसा नाही. हे संस्थाचालक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित आहेत. त्यांना वाचवण्यासाठी देवेंद्रांच्या गृह खात्याचे प्रयत्न चालू आहेत की काय असे प्रश्न अनेकांनी विचारले आहेत. मालवणमधील पुतळा दुर्घटनेतील मुख्य आरोपी शिल्पकार आपटे आता जामिनासाठी उच्च न्यायालयात आला आहे. पूर्वी आपल्याला मोठी शिल्पे करण्याचा अनुभव नाही असे त्याने स्वतःच सांगितले होते. त्यामुळेच तो भीतीने सुमारे वीस दिवस दडून बसला होता. आता कोर्टात मात्र तो आपल्याला नौदलासाठी काम करण्याचा चांगला अनुभव होता व पुतळा कोसळण्यात आपला काही दोष नाही असे दावे जोरात करू लागला आहे. हे दावे सरकारतर्फे पुरेशा जोरदारपणे खोडून काढले जात आहेत का याबाबत शंका आहे. इथेही देवेंद्रांच्या गृह खात्याचा काही हात आहे का असा संशय आहे. आता संतोष देशमुख प्रकरणातही अशीच ढिलाई जाणूनबुजून केली जात आहे. विरोधक दुबळे असल्याने सरकारमध्ये ही सुस्ती आणि मस्ती आलेली दिसते. राज्यातील हजारो पदे रिक्त आहेत. निव्वळ वरिष्ठ स्तराचा विचार ला तर उपजिल्हाधिकारी (१६), पोलिस उपअधीक्षक(१६१), मुख्याधिकारी ११९, तहसिलदार व नायब (३४७) अशी पदे भरलीच गेलली नाहीत. म्हणजे मंत्रालयापासून ते खाली जिल्ह्यांपर्यंत सरकारचा कारभार निव्वळ रामभरोसे चालू आहे. जनतेने दाखवलेल्या विश्वासाचे तिला हे चांगले फळ मिळते आहे.

विचार

# तेलंगणातील सूडनाट्य

***तेलंगणामध्ये 'मनी लॉँड्रिंग'च्या कथित गैरव्यवहारावरून माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांचे चिरंजीव के. टी. रामाराव यांच्याविरोधात कारवाई सुरू झाली आहे. सुमारे चार महिन्यांपूर्वी त्यांची मुलगी कविता दिल्ली दारू घोटाळ्यात अडकली होती. ती तिहार तुरुंगातून सुटल्यानंतर आता मुलगा के.टी. रामाराव मोठ्या राजकीय आणि वैयक्तिक संकटाचा सामना करत आहे. तेलगणामध्ये सूडनाट्य पेटले आहे.***



**शैलेश रेड्डी**

कोणताही पक्ष कायम पराभूत होत नसतो, तसेच कायम विजयी होत नसतो. जनता राजकीय पक्षांना जोखत असते. सहनशीलतेच्या पलीकडे गेले की जनता कितीही मोठा पक्ष असला, तरी धडा शिकवते. नुकत्याच निवडून दिलेल्या सरकारविरोधातही ती बंड करू शकते. याच सुमारास राजकीय विरोधकाला कस्पटासमान वागवायची सध्याच्या सत्ताधाऱ्यांची रीत झाली आहे. आपल्या हाती असलेल्या वेगवेगळ्या यंत्रणांचा वापर करून एखाद्याला आयुष्यातून उठवले जाते. गंभीर गुन्हा असला, तर तसे करायलाही हरकत नाही; परंतु हेमंत सोरेन यांनी पाच महिने तुरुंगात काढल्यानंतर त्यांच्याबाबत न्यायालयाने नोंदवलेली निरीक्षणे तपासी यंत्रणाच्या तपास पद्धतीवरच प्रश्न उपस्थित करणारी आहेत. महाराष्ट्रातही अजित पवार, रवींद्र वायकर यांच्याविरोधात तपास यंत्रणेने चुकीच्या माहितीवर कारवाई केली, असा पवित्रा घेतला. या यंत्रणांमुळे झालेल्या बदनामीमुळे कोणी न्यायालयात खेचत नाही, हे त्यांचे भाग्य. आंध्र प्रदेशमध्ये चंद्राबाबू नायडू यांनाही असेच तुरुंगात पाठवण्यात आले. ते संपले, असे वाटत असताना दहा वर्षांनंतर का होईना, त्यांचे जोरात राजकीय पुनरागमन झाले. जगातील वेगवेगळ्या देशातील उद्रेक पाहिले, तर तिथेही सत्ताधाऱ्यांनी अतिरेक केल्यामुळे विद्रोहाची लाट आली. जनतेच्या उठावापुढे सत्ताधीशांना नमावे लागले. लोकशाही व्यवस्थेतही सर्वच यंत्रणांना सर्व काळ मॅनेज करता येते, असा काहींचा गैरसमज असेल, तर तो ही जनता कधी ना कधी दूर करतेच.

'मनी लॉँड्रिंग'च्या कथित गैरव्यवहारावरून माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांचे चिरंजीव के. टी. रामाराव यांच्याविरोधात आता कारवाई सुरू झाली आहे. सुमारे चार महिन्यांपूर्वी त्यांची मुलगी कविता दिल्ली दारू घोटाळ्यात अडकली होती. कविता तिहार तुरुंगातून सुटल्यानंतर आता मुलगा के.टी. रामाराव मोठ्या राजकीय आणि वैयक्तिक संकटाचा सामना करत आहे. तेलंगणातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केटीआर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. २०२३ मध्ये हैदराबादमध्ये झालेल्या फॉर्म्युला-ई शर्यतीच्या दुसऱ्या स्पर्धेच्या वेळी केटीआर यांनी लंडनच्या एका कंपनीला ५५ कोटी रुपये हस्तांतरित केल्याचा आरोप आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाबरोबरच अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) केटीआरविरुद्ध मनी लॉँडरिंग प्रतिबंधक कायद्या (पीएमएलए) अंतर्गत माहिती अहवालदेखील दाखल केला आहे. 'हैदराबाद मेट्रोपॉलिटन डेव्हलपमेंट ऑथॉरिटी' (एचएमडीए) कडून 'फॉर्म्युला-ई ऑपरेशन्स'मध्ये ५५ कोटी रुपये हस्तांतरित केल्याचा आरोप आहे. त्यासाठी कोणतीही औपचारिक मान्यता घेण्यात आली नव्हती. या आरोपांवर केटीआर यांनी स्पष्टीकरण दिले आहे. यात घोटाळ्याचा प्रश्नच उद्भवत नाही. पैसे हस्तांतरित झाल्याचे आणि त्याचा वापर केल्याचे प्राप्तकर्त्याने मान्य केले आहे. त्यामुळे हा गैरव्यवहार होत नाही, तर ती अनियमितता आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. भारत राष्ट्र समिती या पक्षाचे म्हणणे आहे, की मुख्यमंत्री रेवंत रेड्डी या प्रकरणांचा वापर करून त्यांची राजकीय बदनामी करत आहेत.

या प्रकरणी केटीआर यांनी हेही कबूल केले की, मंत्री या नात्याने त्यांनी विशेष मुख्य सचिव अरविंद कुमार (या प्रकरणातील दुसरा आरोपी) यांना पैसे देण्यास सांगितले होते. रेड्डी आणि 'बीआरएस'मधील वैर कोणापासून लपलेले नाही. काँग्रेसची सत्ता आल्यास या कुटुंबाला तुरुंगात पाठवू, असे रेवंत यांनी निवडणूक प्रचारादरम्यान सांगितले होते. २०१५ मध्ये 'कॅश फॉर व्होट' प्रकरणात तुरुंगात घालवलेल्या एका महिन्याबद्दल रेवंत रेड्डी संतापलेले आहेत. ते तेव्हा 'टीडीपी'चे आमदार होते आणि एका अपक्ष आमदाराला पैसे देताना व्हिडीओमध्ये पकडले गेले. हा गुन्हाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नोंदवला होता आणि आता हाच विभाग केटीआर यांच्या प्रकरणाचा तपास करत आहे. रेड्डी काँग्रेसमध्ये आपले स्थान टिकवण्यासाठी 'बीआरएस'ला कमकुवत करण्याची एकही संधी सोडत नाहीत. केटीआर यांच्या विरोधात लाचलुचपत विभागाला चौकशीचे आदेश देऊन त्यांनी मोठा राजकीय जुगार खेळला आहे. तेलंगणा उच्च न्यायालयाने केटीआर यांच्या अटकेला ३० डिसेंबरपर्यंत स्थगिती दिली आहे; परंतु त्यांना अटक झाल्यास पक्षाला बळ मिळू शकते किंवा कमी होऊ शकते. त्यामुळे 'बीआरएस'चे काही आमदारही पक्ष सोडू शकतात. या संपूर्ण प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर भाजप सक्रिय झाल्याचे दिसत आहे. राज्यपालांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला प्रकरण पुढे चालवण्याची परवानगी दिली. भाजप आणि काँग्रेस विळ्या-भोपळ्याचे सख्य असताना या प्रकरणात मात्र रेवंत रेड्डी यांनी या प्रकरणी कारवाईसाठी दिल्लीतून भाजपचा पाठिंबा घेतला आहे, असा आरोप 'बीआरएस' करत आहे. आंध्र प्रदेशमधील चंद्राबाबू नायडू यांच्या अटकेतून रेवंत रेड्डी यांनी धडा घ्यायला पाहिजे. नायडू यांच्या अटकेमुळे त्यांच्याबद्दल सहानुभूतीची लाट निर्माण झाली. त्यामुळे ते २०२४ मध्ये सत्तेत परतले. विशेषतः तरुण आणि शहरी भागात केटीआर यांची लोकप्रियता आहे. अशा परिस्थितीत रेवंत यांनी अत्यंत सावधपणे पावले उचलण्याची गरज आहे. तेलंगणामधले राजकारण सध्या गोंधळाचे आहे. आता केटीआर आणि बीआरएस या संकटाचा सामना कसा करतात आणि काँग्रेस हा राजकीय जुगार कसा खेळते हे पाहायचे आहे. दरम्यान, अंमलबजावणी संचालनालया (ईडी) नेही केटी रामाराव, वरिष्ठ आयएएस अरविंद कुमार आणि 'एचएमडीए'चे माजी मुख्य अभियंता बीएलएन रेड्डी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. 'मनी लॉँडरिंग प्रतिबंधक कायदा' (पीएमएलए) आणि परकीय चलन व्यवस्थापन कायदा (फेमा) अंतर्गत 'ईडी'ने गुन्हा दाखल केला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केल्यानंतर अवघ्या २४ तासांमध्ये ही घटना घडली आहे. 'ईडी'च्या सूत्रांनी या प्रकरणाच्या नोंदणीची पुष्टी केली आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या यंत्रणा एकाच वेळी कशा सक्रिय झाल्या, याचे कोडे सामान्यांना पडले असले, तरी शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या नात्याने ही दोन्ही सरकारे एकत्र येऊन यंत्रणांना कामाला लावले असल्याचा संशय आहे.


लाचलुचपत प्रतिबंधक ब्यूरोने (एसीबी) केटीआर यांच्याविरुद्ध मागील सरकारच्या काळात हैदराबादमध्ये फॉर्म्युला-ई रेस आयोजित करण्यात अनियमितता केल्याबद्दल फिर्याद दाखल केली होता. तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी अलीकडेच या मुद्द्यावर केटी रामाराव यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यास परवानगी दिली होती. रामराव आणि अन्य दोन अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात 'ईडी'चा तपास 'एसीबी'च्या तपासाच्या समांतर चालेल, असे मानले जात आहे. 'आवश्यकता भासल्यास ईडी' रामाराव आणि इतर दोन आरोपींच्या निवासस्थानांची झडती घेऊन छापे टाकू शकते. तीन आरोपींना येत्या काही दिवसांमध्ये हजर राहण्यासाठी 'ईडी' नोटीस बजावू शकते. या शक्यतेमुळे रामाराव आणि त्यांच्या समर्थकांची चिंता वाढली आहे.

इंडियन ओव्हरसीज बँकेत एचएमडीए' (हैदराबाद मेट्रोपॉलिटन डेव्हलपमेंट अथॉरिटी) चे खाते आहे आणि त्या खात्यातून रेस आयोजनाप्रसंगी पैसे ट्रान्सफर करण्यात आले. भारत राष्ट्र समितीचे आमदार केटीआर यांनी राज्यातील काँग्रेस सरकारवर निशाणा साधला आहे. त्यांच्या आरोपांनुसार तेलंगणाच्या जीएसटी संकलनात वर्षभरात एक टक्क्यांहून कमी घट झाली आहे. त्यांच्या मते तेलंगणामध्ये नेहमीच जीएसटी संकलनात किमान १५ टक्के वाढ झाली आहे. तेलंगणा आता उत्तर प्रदेशच्या अर्थव्यवस्थेशी स्पर्धा करत आहे. राज्याने आपल्या विनाशकारी धोरणांमुळे जीएसटी संकलनात शेवटच्या स्थानावर असण्याचा पराक्रम साधला आहे. एकंदरीत, सत्तास्थानी आल्यावर रेवंत रेड्डी सरकार दांडगाई करत विरोधकांवर कारवाई करत आहे. मात्र या कामी अंतिमत: कोणाची बाजू उचलून धरली जाते, हे आता पहायचे.

आजकाल

# कारखाने बंद पडणे ही आता बातमी होत नाही

**संजीव चांदोरकर**



''सामना'' चित्रपटात सरंजामदार हिंदुराव पाटीलांनी मास्तरांना ''बघा आम्ही इथले प्रश्न सोडवले'' सांगितल्यावर

मास्तर हिंदुरावाना एकच प्रश्न विचारतात ''..... अच्छा, मग इथले शेतकरी काय कावळ्यासारखे उडून गेले?''

कॉर्पोरेट/वित्त भांडवलशाहीच्या युगातील सुटेड बुटेड ''हिंदुरावां''ना प्रश्न विचारणारे मास्तर हवे आहेत!

एक काळ असा होता एखादी कंपनी/कारखाना बंद पडणे ही मोठी बातमी होत होती. आता नाही.

कॉर्पोरेट भांडवलशाहीच्या तत्त्वज्ञानानुसार कंपनी/कारखाना बंद करण्याचा अधिकार भांडवलाच्या मालकांना असला पाहिजे. राजकीय वरदहस्त मिळवून त्या प्रणालीने तो अधिकार गाजवायला गेली काही वर्षे सुरुवात देखील केली.

कॉर्पोरेट वित्त भांडवलशाही प्रत्येक अरिष्टामध्ये एक मार्केट अपॉर्च्युनिटी तयार करते. त्यानुसार बंद पडलेल्या कंपन्या आणि कारखान्यांच्या मत्ता (जमिनी, यंत्रसामुग्री, गोदामात पडलेला माल इत्यादी) खरेदी आणि विक्री करण्याचे मोठे मार्केट तयार केले गेले.

त्या खरेदी विक्रीसाठी नवीन कायदे पास केले गेले. नवीन प्रकारच्या कंपन्या तयार केल्या गेल्या. त्यासाठी भांडवल ओतले गेले.

या नवीन प्रकारच्या कंपन्यांना ॲसेटरिकनस्ट्रक्शन कंपनी Asset Reconstruction Company (ARC) म्हणतात. अशा २७ एआरसी देशात कार्यरत आहेत.

बंद पडलेल्या कंपन्याची बँकांकडे थकीत कर्जे साचतात. लोन ॲग्रिमेंट नुसार, कर्ज फेडता आले नाही तर गहाण ठेवलेली मत्ता धनकोकडे वर्ग होते. या बँका या मत्ता एआरसी कंपन्यांना विकतात. एआरसी कंपन्या या मत्ता तोडून मोडून विकतात. त्यातील काही हिस्सा बँकांना देतात. काही हिस्सा ए आर सी कंपन्या स्वतःकडे ठेवतात.

एआरसी निर्वात पोकळीत काम करत नाहीत. कंपनी कायद्यातील बदल. नॅशनल कंपनी लॉर्ड ट्रिब्युनल, इंडियन बँक्रपट्सी कोड, नवीन प्रकारचे प्रोफेशनल केडर, Resolution Professionals, सिक्युरिटी रिसिप्टस अशी समग्र इकॉलॉजी तयार केली गेली आहे. या सर्व एआरसी मिळून विकत घेतलेल्या मत्तांचे मूल्य पहिल्यांदा दहा लाख कोटीच्या वर गेले आहे. या आकड्यांवरून या मार्केटचा अंदाज येईल.

हा दहा लाखांचा आकडा बंद पडलेल्या कंपन्या, बँकांच्या थकीत कर्जाचा, त्यांनी केलेल्या ऱ्हाईट ऑफचा आकडा, एनसीएलटीने मंजूर केलेले डीप हेयर कट्स या सर्व आकड्यांशी ताळमेळ घालून आहे हे नक्की

बंद पडलेल्या कंपन्या/कारखान्यांचा प्रश्न बघा आम्ही कसा सोडवला हे सांगणाऱ्या कॉर्पोरेट/वित्त भांडवलशाहीतील सुटेड बुटेड हिंदुरावाना खालील प्रश्न विचारणारे मास्तर हवे आहेत :

''मग त्या कंपन्या/कारखान्यात काम करणारे कामगार कोठे गेले? प्रत्येक कामगारांमागे कंपनी/कारखान्याच्या आजूबाजूला मोठ्या संख्येने तयार होणारे असंघटित क्षेत्रातील रोजगार मिळवणारे कोठे गेले. त्या कामगार/स्वयंरोगारांच्या बायका/मुले/आईवडिलांचे काय झाले?''

हा प्रश्न फक्त बंद कंपन्या आणि एआरसी मधला नाही. प्रत्येक क्षेत्रात असे प्रतिप्रश्न विचारण्याचा प्रतीक्षेत आहेत; हे अकॅडेमिक प्रश्न नाहीत. तर माणसांच्या रक्त/अश्रूंनी भिजलेले प्रश्न आहेत.

फ्युडल लॉर्ड हिंदुराव पाटीलांना/ फ्युडलिझम वर धारदार टीका करणे म्हटले तर सोपे आहे. त्याला लेखक / कलाकार / फंडिंग / स्पॉन्सर्स मिळतील.

पण आधुनिक कॉर्पोरेट/वित्त भांडवलशाहीच्या ''पायाभूत सुविधा निर्माण म्हणजे प्रगती''च्या झगमगीत संकल्पना चित्रातील, आतमध्ये रक्त / अश्रू ओघळणारी भोके शोधून ती दाखवणे कठीण आहे.

कारण त्या प्रणालीने आपल्या डोळ्यामध्ये त्यांना सोयीची भिंगे बसवली आहेत. त्यांना जे हवे तेवढेच आपल्याला दिसते. रक्त/अश्रूंची भोके दिसतच नाहीत. आणि मुख्य म्हणजे त्याला कोणी स्पॉन्सर्सच मिळणार नाहीयेत.

लोकसंसद

## विषारी धुरक्यात हरवली मुंबई



एकीकडे मुंबईसह राज्यभरात हव्या हव्याशा वाटणाऱ्या थंडीचा मोसम सुरु झाला असतानाच गेले अनेक दिवस मुंबई धुक्यात नव्हे तर धुरक्यात हरवली आहे. धूर आणि धुके यांच्या मिश्रणाने तयार झालेले विषारी धुरके वातावरणात पसरले आहे. गेले काही दिवस मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक सरासरी १७० च्या आसपास रेंगाळतो आहे. मुंबईत वाहनांमुळे वाढलेले प्रदूषण, इमारती तसेच रस्ते, मेट्रो इत्यादी पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांच्या बांधकामामुळे प्रदूषणाच्या पातळीत प्रचंड वाढ झाली असताना धूलिकण आणि प्रदूषके वाहून नेणाऱ्या समुद्रातील वाऱ्याचा वेगही कमी झाला आहे. त्यामुळे हवेची गुणवत्ता ढासळली आहे. सर्वत्र पसरलेल्या धुरक्यामुळे वातावरणातील दृष्यमानताही कमी झाली आहे. वाढत्या प्रदूषणाचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून श्वसनाच्या दम्यासारख्या आजारांबरोबरच सर्दी, खोकला, घसा खवखवणे, अशा रुग्णांची संख्या वाढली आहे. मुंबईतील वाढत्या हवा प्रदूषणामुळे विषाणूजन्य आजार बळावण्याच्या शक्यतेमुळे नागरिकांनी सावध राहून स्वतःच्या प्रकृतीची काळजी घेणे गरजेचे आहे. **-प्रदीप शंकर मोरे, मुंबई**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**३१ डिसेंबर**

**१८८८ :-** व्यासंगी लेखक म्हणून ख्याती मिळवणारे विष्णू केशव पाळेकर यांचा जन्म. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या चरित्र ग्रंथासह वैदिक कालखंडाचा परिचय करून देणारे ऋग्वेदाचा संदेश, वेदांचे अपौरूषेयत्व, हिंदू कोडाचें कृष्णकारस्थान, मराठेशाहीचा अंत, भारतीय विवाह शास्त्र दोन साम्यवाद, पतंजल योगसूत्रे ही पुस्तके आणि ऐक्याचे खरे शत्रू व सनातन्यांचे भवितव्य हा निबंध संग्रह अशी साहित्य संपदा. **१९०८:** वेदविद्यापारंगत महामहोपाध्याय यज्ञेश-वरशास्त्री कस्तुरे यांचा जन्म. पारंपारिक पाठशालेतून शिक्षण घेतल्यानंतर नांदेड येथे संस्कृत पाठशाळेची स्थापना केली. 'निवृत्तीप्रवृत्तीधर्म', 'रसविचार', 'भामती प्रकाश वेदांत परिभाषा' आदी ग्रंथ तसेच विविध नियतकालिकातून शोधनिबंध प्रकाशित. **१९१६ :** संपादक, साहित्यिक बालशंकर देवराव देशपांडे यांचा जन्म. समर्थ, वसंत ही मासिके आणि साहित्यस्वप्न हे साप्ताहिक त्यांनी काही काळ संपादित केले. विविध नियतकालिके आणि वृत्तपत्रातून कथा, कादंबरी, कविता, ललित निबंध, प्रवास वर्णन, व्यक्ती चित्रण समीक्षा असे सर्व प्रकारचे लेखन, यावर आधारित चाळीसहून अधिक पुस्तके प्रकाशित श्रावणातल्या विजा, यमुनाजळी, शोभेचे सौभाग्य हे कथासंग्रह; माझे जग ही कादंबरी; वराडी कणसे,तांडव आणि लास्य हे लघुनिबंध; रस रंग हे काव्य; शब्दसृष्टीचे ईश्वर ही संतकाव्याची समीक्षा; माझा उत्तर हिंदुस्तानचा प्रवास, दक्षिणद्वार देवगिरी ही प्रवास वर्णने आणि विद्यार्थी मित्रहो ही भाषणे अशी त्यांची निवडक पण लोकप्रिय साहित्य संपदा. **१९१६ :-** लेखक मनोहर विनायक गोखले यांचा जन्म. ह्यांनी 'जॉर्ज वॉशिंग्टन देशात', 'दक्षिण भारतः एक आनंद पर्यटन' या प्रवासवर्णनात्मक पुस्तकांशिवाय 'नाट्य माधुरी भाग १ ते ५ ह्या बालनाटिका', 'नाट्य संजीवनी' मधून तीन विनोदी नाटिका आणि 'हसरे न्यायालय' मधून न्यायालयातील विनोद अशी साहित्य संपदा. **१९३०:-** लेखक आणि सहकार क्षेत्रातील एक जाणकार प्राचार्य माधव विष्णू नातू यांचा जन्म. 'सहकारी संस्थांचे व्यवस्थापन' हा त्यांचा ग्रंथ सहकारी क्षेत्रातील व्यवस्थापन शास्त्राचे महत्त्व सांगणारा आहे. **१९३४ :-** लेखक रमाकांत मुरलीधर तांबोळी यांचा जन्म. **१९३५ :-** कवी उपाख्य वामनराव चंपतराव ठाकरे यांचा जन्म. ह्यांचा 'गीतसुगंध', 'साई प्रसाद' हे गीतसंग्रह, 'रुप झाडीचा' हा झाडीकाव्यसंग्रह 'चटनीचा पेंड' हा झाडीकथासंग्रह आणि 'गजरा' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९३५:-** एकांकिका लेखक, अभिनेते वृंदावन रामचंद्र दंडवते यांचा जन्म. 'कुलवृत्तांत', 'खोटं नाटक', 'संगीत दृष्टचक्र', 'मायाळू' या त्यांच्या प्रायोगिक एकांकिका प्रसिद्ध झाल्या आहेत. **१९५२:-** शैक्षणिक विषयांवरील लेखक डॉ. केशव मधुकरराव भांडारकर यांचा जन्म. 'उद्याचे शिक्षण','पर्यावरण शिकवण' ही शैक्षणिक पुस्तके त्यांची प्रकाशित झाली आहेत. **१९५५ :-** लेखक जयप्रकाश बभूला गवळे यांचा जन्म. 'वेदना' ही दलित कादंबरी त्यांनी लिहिली आहे. **१९८५ :-** लेखक, मुद्रण सल्लागार बापूराव नाईक यांचे निधन. ह्यांच्या नावावर काही संकलन आणि संपादित साहित्य असून ह्यांनी 'कागद' या ग्रंथातून कागदाचा तर 'भारतीय ग्रंथमुद्रण' मधून ग्रंथ मुद्रण प्रकाशनाचा इतिहास लिहिलाय. याशिवाय 'मुंबईचा वृत्तांत' तसेच 'मुद्राक्षर लेखनकला खंड १,२' हा टायपोग्राफीविषयक ग्रंथ अशी साहित्य संपदा.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# मुंडेंना मंत्रीपदापासून दूर ठेवा

## विजय वडेट्टीवार यांची मागणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींचा अद्याप काहीच थांगपत्ता पोलिसांना लागलेला नाही. सीआयडीलाही सापडत नाहीत मग ते कुठे लपलेत, त्यांचे काय झाले, अशी चर्चा आता सुरू झाली आहे. मुख्य आरोपीपर्यंत पोहोचता येऊ नये म्हणून बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला चकमकीत ठार केले गेले. तसेच, बीडच्या आरोपींबाबत होऊ शकते, अशी शक्यता काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केली आहे.**



विजय वडेट्टीवार यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बीड प्रकरणावरून महायुती सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले की, महाविकास आघाडी आणि महायुती सरकारमध्ये हाच फरक आहे. पूजा चव्हाण हत्याप्रकरणी आरोप होताच महाविकास आघाडी सरकारने संजय राठोड यांना मंत्रिपदावरून दूर केले होते. महायुती सरकारने मात्र धनंजय मुंडेंबाबत काहीच भूमिका घेतलेली नाही, असे सांगत या प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत त्यांना मंत्रिपदापासून दूर ठेवा, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

ते पुढे म्हणाले की, प्रेम करून मारहाण करतात, सोडूनही देतात. तुमची परवानगी असेल तर दहा-दहा बायका करा, पण कोणाचा खून तरी करू नका, असे म्हणत वडेट्टीवार यांनी धनंजय मुंडेंवर शरसंधान केले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींची हत्या झाल्याचा दावा अंजली दमानिया यांनी केला आहे त्यात तथ्य असू शकते, असे सांगत त्यांनी बदलापूरच्या अक्षय शिंदे प्रकरणाचा दाखला दिला आहे.

### आकाच्या वर काका बसलाय

**बीडमध्ये महिलांच्या शोषणाच्याही अनेक घटना घडल्या आहेत. सरकारने यासंदर्भात सीबीआय चौकशी केली पाहिजे, असे वडेट्टीवार म्हणाले. आकाच्या वर काका आहे, तो सर्व आरोपींना वाचवतोय, असा आरोपही त्यांनी केला आहे. पोलिसांना सापडलेल्या आरोपींच्या मोबाईल फोनमधील कॉल रेकॉर्ड तपासले गेले तर आरोपींनी कोणत्या मोठ्या माणसाला फोन केला हे उघड होईल, असेही ते म्हणाले.**

# गोवा बनावटीचे मद्य जप्त

**। राजापुर । प्रतिनिधी ।**



रत्नागिरी जिल्ह्यातील गावागावांमध्ये सुरू असलेल्या गोवा बनावटीच्या मद्याचा बीमोड करण्याची मोहीम राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकाने सुरू केली आहे. या मोहिमेचा प्रारंभ राजापूर तालुक्यातील नाटे येथील बांदकरवाडीतून झाला आहे. या भरारी पथकाने शुक्रवारी (दि.२७) टाकलेल्या छाप्यात १ लाख ९७ हजार रुपये किमतीचे गोवा बनावटीचे मद्य जप्त केले आहे. त्याचबरोबर बेकायदेशीररीत्या मद्य विक्री करणाऱ्या ईश्वरसिंग रामचंद्र बांदकर (४६) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, दुसऱ्या एका कारवाईत राजापुरातील हातिवले-जैतापूर मार्गावर गोवा मद्याची वाहतूक करणाऱ्या कारमध्ये १ लाख ५८ हजार किमतीच्या मद्यासह १ लाख ४० हजार रुपये किमतीची कारही जप्त करण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक कीर्ती शेडगे यांनी रत्नागिरी जिल्हा भरारी पथकासह सर्व युनिटना कारवाई करण्याच्या सूचना केल्या आहेत, त्यानुसार भरारी पथकाचे निरीक्षक अमित पाडळकर पथकातील सहकारी दुय्यम निरीक्षक जी. सी. जाधव, एस. बी. यादव, जवान मानस पवार, वैभव सोनावले, व्ही. के. भोसले, एस. टिकार, एन. जे. तुपे यांनी कारवाईला प्रारंभ केला आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३१ डिसेंबर

१) श्री. रामचंद्र शंकर लाड
चेंढरे-अलिबाग, ३१-१२-१९४५

२) श्रीम. स्वाती शिरीष लेले
अलिबाग, ३१-१२-१९५९

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कु. ऋग्वेद ओमकार राऊत, वाढदिवस, नवेदर नवगांव, अलिबाग.**

# मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावली

## पालिकेकडून पाऊले उचलण्यास सुरुवात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गेल्या काही दिवसांपासून मुंबई आणि उपनगरांमध्ये धुक्यांऐवजी दुषित हवा पाहायला मिळत आहे. त्यामुळे मुंबईतील हवेचा दर्जा खालावला आहे. परंतु, आता परिस्थिती चिंताजनक बनत चालली असून मुंबईची आणि दिल्लीतील दुषित हवा यांच्यामध्ये स्पर्धा सुरू आहे की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या मुंबईचा हवा निर्देशांक १०४ इतका नोंदवण्यात आला आहे. ज्यामुळे मुंबईकरांना सध्या प्रदूषणाचा त्रास होत आहे. त्यामुळे आता मुंबई महापालिका प्रशासन आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कठोर पाऊले उचलण्यास सुरुवात झाली आहे. परंतु, हवेतील गुणवत्ता सुधारणे हे मोठे आव्हान मुंबई महापालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळासमोर आहे.



मुंबईतील विलेपार्ले, कुलाबा, मालाड, कुर्ला, भांडुप, देवनार, बोरिवली, वांद्रे पूर्व या उपनगरांधील हवेची गुणवत्ता अत्यंत वाईट असल्याची नोंद करण्यात आली आहे. त्या मोगामाग आता नेरुळ, महापे, जुहू आणि छत्रपती शिवाजी महाराज विमानतळ या परिसरातील हवेचा दर्जा सुद्धा खालावत चाललेला आहे. याबाबतची नोंदही हवामान विभागाकडून करण्यात आली आहे. मुंबईचा सध्याचा हवेतील निर्देशांक हा १०४ इतका नोंदविण्यात आला आला आहे. मुंबईत सुरू असलेल्या बांधकामांमुळे आणि सातत्याने होणाऱ्या हवामानातील बदलामुळे हवेतील गुणवत्तेचा दर्जा ढासाळत चालला आहे, असे सांगण्यात येत आहे. परंतु, यामुळे मुंबईकरांना श्वसनाचा आणि घशाचा आजार होऊ लागला आहे.

# तारापूर एमआयडीसीत भीषण आग

**। पालघर । प्रतिनिधी ।**



आशिया खंडातील सर्वात मोठ्या औद्योगिक क्षेत्रापैकी एक असलेल्या बोईसर तारापूर एमआयडीसीत भीषण आग लागल्याची घटना रविवारी (दि.२९) घडली आहे. बोईसर-तारापूर औद्योगिक कार्यक्षेत्रातील प्लॉट नंबर के-६ मधील युके अ‍ॅरोमॅटिक अँड केमिकल्स या कारखान्याला भीषण आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. या कारखान्यातील कामगारांना सुट्टीचा दिवस असल्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. मात्र, ही आग कशामुळे लागली हे कारण अजूनही अस्पष्ट आहे. हा केमिकलचा कारखाना असल्यामुळे आग झपाट्याने पसरल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. ही आग इतकी भीषण होती की आगीचे आणि धुराचे लांबच लांब लोळ लांबून दिसत होते.

तारापूर एमआयडीसीतील युके अ‍ॅरोमॅटिक अँड केमिकल कंपनीला लागलेल्या आगीचा भडका वाढल्याने कंपनीशेजारी असलेल्या श्री केमिकलला देखील आग लागली. यात श्री केमिकल कंपनी देखील आगीच्या भक्षस्थानी पडली. दरम्यान, अग्निशमनदलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. सुदैवाने आगीनंतर कामगारांनी पळ काढल्याने मोठी जीवितहानी टळली आहे. दोन्ही कंपन्यांमध्ये कामगार अडकले नसल्याची प्रशासनाची प्राथमिक माहिती आहे.

# खेडमधील हॉटेल मॅनेजरला मारहाण

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

खेड तालुक्यातील निगडे येथील वेंदात हॉटेलमध्ये शुक्रवारी (दि.२७) मारहाणीची घटना घडली होती. गोवा येथून आलेल्या पर्यटकांनी भाकरी देण्यास उशीर झाल्यामुळे हॉटेल मॅनेजर जितेंद्र रसाळ यांच्यावर हल्ला चढवला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, गोव्यातून काही पर्यटक निगडीतील वेदांत हॉटेलमध्ये जेवणासाठी आले होते. त्यांनी अतिरिक्त भाकरीची ऑर्डर दिली होती. मात्र, भाकरी शेकण्यात उशीर झाल्यामुळे पर्यटकांना राग आला. त्यांनी हॉटेल मॅनेजर रसाळ यांच्याशी वाद घालून त्यांना मारहाण केली. यामध्ये रसाळ यांना मुक्कामार बसला आहे, तर हॉटेलमधील फर्निचरही तुटले आहे. या प्रकरणी रसाळ यांनी खेड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, त्यांच्या शोध सुरु आहे. या घटनेमुळे खेड परिसरात खळबळ उडाली आहे. पर्यटकांनी अशा प्रकारे वागणे योग्य नाही, अशी प्रतिक्रिया नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# इंद्रायणी नदी प्रदूषणाच्या विळख्यात

## आदित्य ठाकरेंनी व्यक्त केला संताप

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



पिंपर-चिंचवड पालिका हद्दीतून मैलामिश्रित सांडपाणी आणि उद्योगाचे केमिकल रसायनमिश्रित दूषित पाणी थेट इंद्रायणी नदीत येत असल्याने तीर्थक्षेत्र आळंदीत इंद्रायणी नदी पुन्हा फेसाळली असून नदी प्रदूषण वाढल्याने आळंदीत भाविक, नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे. यावरून शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आ. आदित्य ठाकरे यांनी यावरून संताप व्यक्त केला आहे. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा विषय दिवसेंदिवस गंभीर होत आहे. स्थानिकांच्या आणि भाविकांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होता आहे. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा विषय दिवसेंदिवस गंभीर होत आहे. स्थानिकांच्या आणि भाविकांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत आहे. गेल्यावर्षीसुध्दा हा मुद्दा आम्ही प्रशासनाच्या दृष्टीस आणून दिला होता, पण त्यानंतरही कार्यवाही शून्यच. यासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांनी कटाक्षाने लक्ष देऊन, लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणीच्या स्वच्छतेचा प्रस्ताव केंद्राकडूनही लवकर मंजूर करून घ्यावा. तसेच सांडपाण्यावर प्रक्रिया न करता नदीत सोडणाऱ्या कारखान्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आदित्य ठाकरेंनी केली आहे.

# धरणातच जलसमाधी घेण्याचा इशारा

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

खेड तालुक्यातील शिवतर येथे लघुपाटबंधारे योजनेंतर्गत बांधण्यात येत असलेल्या धरणासाठी आजी-माजी सैनिकांनी वडिलोपार्जित शेतजमिनी दिल्या आहेत; मात्र शासनाकडून अद्याप जागेचा मोबदला देण्यात आलेला नाही. या निषेधार्थ आजी-माजी सैनिकांनी प्रशासनाविरोधात दंड थोपटले असून, प्रजासत्ताकदिनी धरणातच जलसमाधी घेण्याचा इशारा दिला आहे.



शिवतर येथील धरण बांधकाम अंतिम टप्प्यात असून, येत्या महिनाभरातच ते पूर्ण होणार आहे. शिवतरसह पंचक्रोशीतील गावांना पिण्यासाठी तसेच शेतीच्या कामासाठी पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी आजी-माजी सैनिकांनी जमिनी दिल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत भूसंपादनाची प्रक्रिया करण्यात आली. कोरोनाच्या संकटामुळे जमिनी खरेदी विक्रीचे व्यवहार झाले नव्हते. उपलब्ध व्यवहारापैकी पहिले दोन व्यवहार हे अधिकतम रक्कमेचे ग्राह्य धरावेत, असा शासकीय निकष असल्याने ते व्यवहार झाले आहेत. त्यांची सरासरी काढल्यास किमान ९ ते १० हजार रुपयांचा प्रतिगुंठा दर देणे क्रमप्राप्त आहे; मात्र शासनाने या नियमाला हरताळ फासल्याचा आरोप करण्यात आला आहे.

येत्या काही दिवसांत धरणासाठी देण्यात आलेल्या जमिनीपोटी योग्य मोबदला न मिळाल्यास धरणातच जलसमाधी घेण्याचा इशारा शिवतर ग्रामस्थ शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष रोहिदास मोरे यांसह आजी-माजी सैनिकांनी दिला आहे. याबाबत मुख्यमंत्र्यांना पत्र देण्यात आले असून, ग्रामस्थांना तातडीने योग्य तो मोबदला मिळवून द्यावा, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

# धामणी येथे दोन मोटारींचा अपघात

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**



मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील धामणी येथे दोन मोटारीच्या अपघातात दोन्ही वाहनांमधील ७ प्रवासी जखमी झाले आहेत. अपघाताची बातमी समजताच संगमेश्वर पोलिस दाखल झाले. जखमींना १०८ रुग्णवाहिका व खासगी वाहनाने संगमेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

दोन मोटारींची समोरासमोर धडक झाली. हा अपघात मुंबई गोवा महामार्गावरील संगमेश्वर रोड रेल्वेस्टेशनपासून जवळच असलेल्या मोरया ढाब्यासमोर झाला. मोटारचालक अतुल आनंद किशोर नंदा (३४) हा गोवा ते मुंबईकडे जात होता. दुसऱ्या मोटारीचा चालक ओंकार शंकर घाडगे (२३) साताऱ्याहून गणपतीपुळेकडे जात होता. सुसाट वेगात येणाऱ्या दोन्ही मोटारींची समोरासमोर जोरदार धडक झाली. ही धडक एवढी जबरदस्त होती की, गोव्याच्या दिशेने धावणारी मोटार मुंबईच्या दिशेने फिरली. एका मोटारीची एअर बॅग उघडल्याने होणारी जीवितहानी टळली असून चालक अतुल नंदा, लिंडा मेलवान डिक्रॉस्टा (५८), शॉन मेलवीन डिकॉस्टा (२४) यांना मार लागला आहे. लिंडा मेलवीन या महिलेच्या डोक्याला मार लागून रक्तस्राव झाला आणि पायालाही दुखापत झाली आहे. दुसऱ्या मोटारीतील ओंकार घाडगे (२३), अभिजित अशोक खरात (२४), प्रदीप माने (२०) यांना मार लागला असून या सर्वांवर संगमेश्वर ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले.

अपघातामुळे महामार्गावर दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. संगमेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत कांबळे, पोलीस कॉन्स्टेबल यांनी वाहतूक सुरळीत केली. पुढील तपास उपनिरीक्षक चंद्रकांत कांबळे करत आहेत.

# दापोलीत बेसुमार झाडांची कत्तल

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

एकीकडे झाडे लावा झाडे जगवाचा शासनाकडून संदेश दिला जात आहे, तर दुसरीकडे मात्र दापोलीत डोळ्यावर पट्टी बांधलेल्या वन विभागाच्या आशिर्वादानेच राजरोसपणे झाडांची कत्तल केली जात आहे. निसर्ग संपन्नतेने नटलेल्या दापोली तालुक्यात वृक्ष तोडीचा अक्षरशः हैदोस सुरू आहे. अगदी राजरोसपणे झाडांची कत्तल होत आहे. असे असतानाही वन विभाग मात्र बघ्याची भूमिका निभावताना दिसत आहे. त्यामुळे वन विभागातील अधिकाऱ्यांच्या आशिर्वादाने वन संपत्तीचा नाश होत असल्याला चर्चा रंगताना दिसत आहे.

दापोली तालुक्यात बेसुमार वृक्ष तोड होत असताना लाकुड माफिया, हे वन विभाग आपल्या खिशात असल्याचे भासवत व्यापारी आणि दलाल यांच्या संगनमताने वृक्षतोड करत आहेत. वृक्ष तोडीचा येथील पर्जन्यमानावर तर परिणाम होतोच आहे, शिवाय पर्यावरणाचा ऱ्हास होत वातावरणाचा समतोल बिघडत आहे. वृक्ष तोडीच्या प्रकाराबाबत मात्र तालुक्यातील वन विभाग अधिकारी हे डोळ्यावर गांधारीची पट्टी बांधून भुमिका निभावताना दिसत आहेत. या सर्व प्रकाराला वन परिक्षेत्र मंडळ दापोलीचे कार्यालय जबाबदार असल्याची जनतेची भावना आहे. झाडे लावा झाडे जगवा हा शासनाचा संदेश अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पायदळी तुडवला गेला आहे. त्यामुळे अंमलबजावणीचे सोडा पण आहे त्या वनसंपदेचे भविष्यात वन विभागाकडून रक्षण केले जाईल का? असा सवाल येथील सजग नागरिकांकडून विचारला जात आहे.

# विवळवेढे उड्डाणपुलावर भीषण अपघात



## टँकरमधून रसायन गळती

**। पालघर । प्रतिनिधी ।**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर विवळवेढे उड्डाणपुलावर सोमवारी (दि.३०) दुपारी १ वाजताच्या सुमारास रसायन वाहतूक करणाऱ्या टँकरने सिमेंट पाईप घेऊन जाणाऱ्या ट्रेलरला धडक दिली. यामुळे भीषण अपघात झाला होता. या अपघातात रसायनाने भरलेला टँकर फुटून मोठ्या प्रमाणत रसायनाची गळती झाली होती. तसेच, चालक टँकरमध्ये अडकला आहे. तर, सिमेंट पाईप वाहून नेणाऱ्या वाहनाचे देखील मोठे नुकसान झाले आहे. या अपघातामुळे महामार्गावरील मुंबई वाहिनीवरील वाहतूक काही काळ थांबवण्यात आली होती. दरम्यान, स्थानिकांनी टँकरमध्ये अडकलेल्या चालकाला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. पोलीस यंत्रणेला माहिती मिळाल्यानंतर काही वेळात पोलीस घटनास्थळी दाखल होऊन चालकाला बाहेर काढण्याचे प्रयत्न करण्यात आले. यावेळी, वाहनांमधून मोठ्या प्रमाणात रसायन गळती झाल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, रसायन ज्वलनशील नसल्याची खात्री पटल्यानंतर नागरिकांनी वाहनजवळ जाऊन मदतकार्य सुरू केले.

## वन डिस्ट्रक्ट वन प्रॉडक्ट अ‍ॅवॉर्डसाठी नामांकन

# हापूसच्या उत्पादनात रत्नागिरी ब्रँड

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

**केंद्र शासनाच्या ‘वन डिस्ट्रक्ट वन प्रॉडक्ट अ‍ॅवॉर्डसाठी देशातील ६० जिल्ह्यांना नामांकन मिळाले आहे. यात महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांना ते मिळाले असून, त्यामध्ये रत्नागिरीचा समावेश आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या इन्व्हेस्ट इंडियाचे सहायक व्यवस्थापक ताशी दोरजे शेर्पा यांनी याबाबत नुकतीच बैठक घेतली होती. जिल्ह्याने केलेल्या कामगिरीबद्दल गौरवोद्गार काढले आहेत.**

यावेळी शेर्पा म्हणाले की, देशातील ६० जिल्ह्यांतील आणि राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये रत्नागिरी जिल्ह्याचा समावेश आहे. क्यूआरकोड, मोबाईल कुलिंग युनिट यांसारखी चांगली कामगिरी आणि खूप चांगले काम तुम्ही सर्वांनी केले आहे. हापूस आंब्याच्या संदर्भात रत्नागिरी हा एक देशात ब्रँड झाला असल्याचे गारैरवोद्गार त्यांनी काढले आहेत. तसेच, जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी संगणकीय सादरीकरण करून सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की, आंब्याबरोबरच काजू, नारळ, कोकम आणि मासे ही जिल्ह्याची उत्पादने आहेत. २०१८ ला हापूस आंब्याला जीआय टॅग मिळाला आहे. राज्यामध्ये १६२.०८ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये आंबा क्षेत्र आहे. त्यातून ४६३.१७ हजार टन आंबा उत्पादन होते. हेच प्रमाण कोकण विभागात १२६.४१ हजार हेक्टर लागवड क्षेत्रामध्ये २१३.३७ हजार टन आंबा उत्पादन होतो. एकट्या रत्नागिरी जिल्ह्यामध्ये ६७.७९ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये आंब्याची लागवड आहे. त्यातून १२३.०६ हजार टन आंबा उत्पादन होत असल्याचे त्यांनी सांगितले.



यावेळी बैठकीला मिलिंद जोशी, संकेत कदम, डॉ. विवेक भिडे, अंबरिश मिस्त्री, हापूस आंबा उत्पादक संघाचे मुकुंदराव जोशी आदी उपस्थित होते.

### दृष्टिक्षेपात हापूसविषयक कामगिरी

**२०२२-२३ ला जिल्ह्यात सर्वाधिक क्षेत्रात लागवड**
**१ लाख २३ हजार ६८ टन आंबा उत्पादन**
**रत्नागिरी जिल्हा प्रथम क्रमांकावर राहिला**
**२०२२-२३ मध्ये रत्नागिरीमधून १४५.९८ लाख आंबा निर्यात**
**२०२३-२४ वर्षासाठी रत्नागिरीमधून २५०.८६ लाख उत्पन्न.**

### हापूसची आयात करणारे देश

**कुवेत, संयुक्त अरब अमिराती, युनायटेड किंग्डम, कतार, ओमान, युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका, बहरिन आणि कॅनडा**

# बोगस आंबा विक्रीला पायबंद

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

देवगड हापूस आंबा विक्री करताना आता जे महत्त्वाचे संकट आहे ते म्हणजे इतर भागातील, राज्यातील आंबा हा देवगड हापूसच्या नावाखाली मुंबई, पुणे, सांगली व अन्य भागातही मोठ्या प्रमाणावर विक्री केला जातो. देवगडमध्ये होणाऱ्या एकूण आंबा उत्पादनाच्या कितीतरी पटीने देवगड हापूस आंब्याची बोगस विक्री बाजारपेठेत होत असते. हा आंबा कर्नाटक, बेंगलोर, गुजरात व अन्य सीमावर्ती भागातून येतो. याला बंद करण्यासाठी देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने अनेक वर्षे झगडून जीआय मानांकन प्राप्त केले आणि जीआय धारक शेतकऱ्यांची संख्या वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. मात्र, नुसते जीआय मानांकन घेऊन हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी त्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासकीय व अन्य यंत्रणा कार्यरत नाही. यासाठी संस्थेने देवगड हापूस नावाने विकल्या जाणाऱ्या प्रत्येक आंब्यावर यूआयडी प्रशाणे एक युनिक कोड असणारा स्टिकर लावण्याची सिस्टम डेव्हलप केलेली आहे आणि या पद्धतीचे पेटंटही घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याचे ठरविले आहे.

# पेणकरांना शहाणपण केव्हा येईल ?

## भोगावती नदी प्रदूषित करण्याचा विढाच

**। पेण । प्रतिनिधी ।**

**पेण शहराच्या सर्वांगीण प्रगतीची महत्त्वाची बाब आहे ती म्हणजे भोगावती नदी. परंतु, आज भोगावती नदीला सर्व बाजूने प्रदूषित करण्याचा विढाच जणू काही पेणकरांनी उचललेला आहे.**



● आंबेघर पुलाच्या रेलिंगला अडकलेल्या कचऱ्याच्या पिशव्या.

पेण शहर हे फक्त सुनियोजित शहर नसून, ते ऐतिहासिक शहर असल्याने पेण शहराची गटार व्यवस्था ही अगदी १६ व्या शतकापासून आहे त्या स्थितीत आहे. मात्र, पेण शहर हे रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण आणि भविष्यात तिसऱ्या मुंबईचे केंद्रस्थान असल्याने गेल्या १५ ते २० वर्षांत पेण शहराचे शहरीकरण दामदुपटीने वाढले आहे. त्यामुळे सांडपाण्याची व्यवस्थादेखील (गटार व्यवस्था) योग्य नाही. एक काळ असा होता की, पेण शहराला पाणीपुरवठा हे मोतीराम तलावामधून होत होता आणि मोतीराम तलाव हाच एक मुख्य स्रोत पाणीपुरवठा पेणकरांचा होता. त्यातच पेणमध्ये वाडा संस्कृती असल्याने प्रत्येकाच्या स्वतःच्या विहिरी असल्याने नगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा व्हायलाच हवा, असा काही अट्टाहास नव्हता. त्यामुळे जी जुनी गटार व्यवस्था होती, ती गटार व्यवस्था कायम राहिली. परंतु, शहरीकरणाचा लोंढा एवढा वाढला की, वाडा संस्कृतीचा ऱ्हास होउन आज मोठ मोठाली सिमेंटची जंगले झाली आहेत. त्यामुळे कालपरत्वे विहिरीचे अस्तित्व नाहीसे झाले. पेणकरांना भोगावती नदीच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागले. गेली ४ ते ५ दशके पेणकरांना भोगावती नदीमधूनच पाणीपुरवठा होत आहे. मात्र, गटार व्यवस्था ही जुनीच असल्याने पाटणोली ग्रामपंचायतची हद्द वगळता सर्व सांडपाणी भोगावती नदीमध्ये सोडले जात आहे आणि त्याच भोगावती नदीमधून पेणकरांसाठी पाणीपुरवठा केला जात आहे. आजच्या स्थितीला पेणशहरात दोन जलशुध्दिकीकरण केंद्र आहेत. हे दोन जलशुध्दिकीकरण केंद्र पूर्ण क्षमतेने चालल्यास ११ ते ११.५ एमएलटी पाणी शुध्द होते. मात्र, झपाट्याने झालेल्या शहरिकरणाला हे पाणी पुरेसे नाही. आताच्या घडीला पेणला १७ ते १८ एमएलटी पाण्याची गरज आहे. परंतु, नगरपालिकेने कितीही ठरवले तरी एवढे पाणी पुरवठा करणे नगरपालिकेला सध्या तरी शक्य नाही.

### हा दोष कुणाचा?

**पेणकरांच्या या विरोधाभास वागण्यामुळे आज भोगावती मोठ्या प्रमाणात प्रदूषित होत आहे. शासन केव्हा निधी उपलब्ध करून देईल तेव्हा पेण येथील गटार व्यवस्था योग्य करून भोगावतीचे पाणी शुध्द केले जाईल. परंतु, आजच्या स्थितीला पेणकरांच्या हातात काही गोष्टी टाळण्यासारख्या आहेत. परंतु पेणकर टाळत नाहीत, हा खऱ्या अर्थाने पेणकरांचा दोष आहे. भोगावती नदीचे पाणी जर पेणकर पीत असतील, तर त्यांना याचे भान ठेवावेच लागेल की, भोगावती नदीमध्ये आपल्या घरातील केरकचरा, निर्माल्य नदीत नेऊन टाकणे हे चुकीचे आहे.**

आज शुध्द पाण्याच्या नावाने मोठ्या प्रमाणात राजकारण केले जात आहे की, पेण शहराला शुध्द पाणी मिळावे ही माफक कल्पनादेखील नागरिकांची चुकीची नाही; परंतु एकंदरीत सध्याचा विचार करता पेणकरांना सध्यातरी थांबावे लागेल एवढे निश्चित. असे असताना पेणकर भोगावती नदीचे पाणी जास्तीत जास्त प्रदूषित कसे होईल याकडे कटाक्षाने लक्ष देत आहेत. कारण, भोगावती नदीच्या आंबेघर पुलावर गेल्यास एक विदारक दृश्य पहायला मिळते. ते म्हणजे, पुलाच्या रेलींगला मोठ्या प्रमाणात केरकचऱ्याच्या पिशव्या अडकलेल्या दिसत आहेत. एकीकडे शुध्द पाणी मिळत नाही म्हणून पेणकर मोठ्या प्रमाणात आक्रमक झालेले पहायला मिळतात. तर, दुसरीकडे स्वतःच भोगावती नदीचे पाणी दूषित कसे करता येईल यासाठी प्रामाणिक प्रयत्न करतात.

# परशुराम दरवडा यांचा आदर्श समाजसेवक म्हणून सन्मान



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

बेडीसगाव आणि परिसरातील सात आदिवासी वाड्या यांच्या माध्यमातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कर्जत तालुका आदिवासी समाज संघटना अध्यक्ष परशुराम दरवडा यांचा आदर्श समाजसेवक पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

कर्जत तालुका बहू आदिवासी भाग असून आदिवासी सामाजाची उन्नतीसाठी व्हावी यासाठी कर्जत तालुका आदिवासी संघटना प्रयत्न करीत आहेत. आदिवासी समाजातील लोकांमध्ये वाद होऊ नयेत आणि समाज गुण्यागोविंदाने नांदत राहावा यासाठी आदिवासी संघटना प्रयत्न करीत आहे. त्या माध्यमातून समाजाच्या उद्धारासाठी विविध सरकारी योजनांच्या माध्यमातूनदेखील संघटनेचा प्रयत्न सुरू असतो. हे प्रयत्न आदिवासी समाजाला विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्या माध्यमातून बेडीसगाव आणि परिसरातील सात आदिवासी वाड्यांमधील ग्रामस्थांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्या कार्यक्रमात आदिवासी कार्यकर्ते आणि कर्जत आदिवासी समाज संघटनेचे अध्यक्ष परशुराम दरवडा यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# बाजारपेठेतील विजेचे खांब कधी हटविणार ?

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



नेरळ गावातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यासाठी २०१७ पासून सुरुवात झालेली होती. नेरळ गावातील बहुसंख्य रस्त्यांचे काँक्रिटीकरण झाले. मात्र, त्यावेळी रस्त्यात उभे असलेले विजेचे खांब आजही तसेच उभे आहेत. नेरळ खांडा पूल येथील विजेचा खांब महावितरण कंपनीने हलविला आहे, मात्र नेरळ बाजारपेठेमधील अनेक विजेचे खांब आजही तसेच उभे आहेत. दरम्यान, नेरळ विकास प्राधिकरणकडून ते विजेचे खांब हलविण्यासाठी निधी दिला जाणार असल्याची आश्वासने दिली जात आहेत, परंतु कार्यवाही होत नसल्याने ग्रामस्थ नाराज आहेत.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील रस्त्यांची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणमधून करण्यात आली आहेत. २०१७ पासून नेरळ गावातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यात येत होते. त्यावेळी प्राधिकरणकडून कामे करण्यात आली; परंतु रस्ताच्या कडेला असलेले विजेचे खांब होते तेथेच कायम आहेत. बाजारपेठ भागातील रस्त्यात काही ठिकाणी अरुंद रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले, परंतु रस्त्यातील विजेचे खांब महावितरण कंपनीकडून अद्याप बाजूला करण्यात आलेले नाहीत. त्यात अनेक विजेचे खांब हे अगदी रस्त्याच्या मधोमधदेखील आहेत आणि त्यामुळे त्याचा फटका वाहतूक कोंडी होण्यास होत असतो.त्यामुळे ते विजेचे खांब रस्त्यातून हलवून रस्त्याच्या कडेला घेण्यात यावेत, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. मात्र, अनेक वर्षे लोटली तरी नेरळ गावातील रस्त्यांमध्ये असलेले विजेचे खांब हलविण्यात नेरळ विकास प्राधिकरण यशस्वी ठरलेले नाही.

नेरळ विकास प्राधिकरणकडून नेरळ गावातील रस्त्यात असलेले विजेचे खांब बाजूला करण्याची मागणी नेरळ ग्रामस्थ करीत आहेत. मात्र, नेरळ ग्रामस्थ यांच्याकडून करण्यात येत असलेल्या अनेक वर्षाच्या मागणीला प्राधिकरणकडून केराची टोपली दाखवली जात आहे. दुसरीकडे नेरळ गावातील विजेचे खांब हलविण्यासाठी महावितरणकडून काही निधीची मागणी करण्यात येत असते.

> **खांडा पूल येथे विजेचे खांब उभे होते. ते विजेचे खांब हलविण्यात यावे यासाठी टॅक्सी संघटनेच्या पुढाकाराने घेतला आणि महावितरण कार्यालयाची मदत घेऊन दोन्ही खांब रस्त्यातून बाजूला काढून घेत रस्त्याच्या कडेला उभे करून घेतले. अन्य भागातील विजेचे खांब महावितरण बाजूला करीत नसल्याने नेरळ ग्रामस्थ नाराज आहेत. त्या खांबामुळे अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राधिकरणाची राहील.**
> **– गोरख शेप,**




**अलिबाग : थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र पार्ट्यांचे बेत आखले जात आहेत. परंतु, ३१ तारखेला मंगळवार आल्याने अनेकांनी रविवारीच पार्ट्या आयोजित केल्या होत्या. महाजने येथील बच्चेकंपनीने जाळी चिकन करुन चांगलाच ताव मारत पार्टी मस्तपैकी एन्जॉय केली.**

# श्रीराम पुलावर वाहतुकीची कोंडी



**■ नवीन पुलाचे काम युद्धपातळीवर करावे**
**■ माजी आ. सुरेश लाड यांची मागणी**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहराचे दोन्ही भाग जोडणाऱ्या उल्हास नदीवरील श्रीराम पूल येथे दररोज वाहतूक कोंडी होत आहे. त्या वाहतूक कोंडीतून कर्जत शहरातील नागरिकांची सुटका व्हावी म्हणून जुन्या पुलाच्या बाजूला नवीन पूल बांधला जात आहे. मात्र, दीड वर्षाचा कालावधी लोटला तरी पुलाचे काम पूर्ण होता नाही आणि त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या वाढली आहे. दरम्यान, त्या अनेक महिने काम बंद असलेल्या पुलाचे काम जलदगतीने व्हावे, अशी मागणी माजी आमदार सुरेश लाड यांनी केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून पुलाच्या रखडलेल्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी श्री. लाड यांनी केली आहे.

कर्जत शहरातून जाणाऱ्या उल्हास नदीवर १९६० मध्ये मुरबाड रस्त्याची निर्मिती झाली त्यावेळी पूल बांधण्यात आला होता. आमराई परिसरात बांधण्यात आलेल्या पुलाला श्रीराम पूल असे नामकरण करण्यात आले आहे. या पुलावरून एकावेळी दोन्ही बाजूला जाणाऱ्या गाड्यांची संख्या एक अशी असल्याने या पुलाच्या परिसरात वाहतूक कोंडी ही नित्याची बनली आहे. त्याचा परिणाम या पुलाच्या दोन्ही बाजूला वाहतूक पोलीस उभे करण्याची वेळ पोलीस प्रशासनाला आली असून कायम त्या ठिकाणी वाहतूक कोंडी वाहनांच्या गर्दीमुळे होत असते. नेहमी होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन विद्यमान आ. महेंद्र थोरवे यांनी २०२३ मध्ये श्रीराम पुलाच्या बाजूला नवीन पूल बांधण्यासाठी निधी मंजूर केला. साधारण आठ कोटी रुपये या पुलाच्या निर्मितीसाठी मंजूर करण्यात आले आहे. दीड वर्षांपासून या पुलाच्या कामास सुरुवात झाली असून, या पुलाच्या निर्मितीमुळे श्रीराम पुलावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

# हनुमान कोळीवाडा ग्रामस्थ संतप्त

## २२ जानेवारीला जेएनपीए समुद्र चॅनेल बंद आंदोलनाचा इशारा

**। उरण । वार्ताहर ।**

४० वर्षे उलटूनही पुनर्वसन झाले नसल्याने हनुमान कोळीवाडा (शेवा कोळीवाडा) ग्रामस्थांवर उपासमारीची वेळ आहे. त्यामुळे संतप्त हनुमान कोळीवाडा (जुना शेवा कोळीवाडा) ग्रामस्थांनी नवीन वर्षाच्या अखेरीस २२ जानेवारी रोजी जेएनपीएचे समुद्र चॅनेल बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. केंद्र व राज्य शासनाकडून प्रत्येक वेळी पुनर्वसनाच्या नावाखाली प्रकल्पग्रस्तांची फसवणूक करण्यात आली असून, प्रत्येक वेळी प्रश्न सोडविण्याचे आश्वासन, मात्र अंमलबजावणी झाली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पुनर्वसन न झाल्याने २५६ कुटुंब आले रस्त्यावर आली असून, पुनर्वसनाचा प्रश्न सोडविण्यात केंद्र व राज्य सरकारला पूर्णपणे अपयश आल्याने त्यांचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

जेएनपीए व्यवस्थापनाने शेवा बेटाच्या सभोवतालच्या मासेमारी जमिनीत प्रकल्पासाठी सन १९८४ साली १४६ हेक्टरचा भराव केला आहे. तसेच शालोबर्थसाठी ३० हेक्टरचा भराव, एनएसआयसीटी प्रकल्पासाठी ३० हेक्टरचा भराव, बल्क टर्मिनल टू कंटेनर टर्मिनलसाठी १८ हेक्टरचा भराव, एनएसआयजीटी ३३० मीटर कंटेनर टर्मिनलसाठी २७.५ हेक्टरचा भराव, बीएमसीटीपीएल फेज १ साठी ९० हेक्टरचा भराव,पोर्ट बर्थसाठी ३९ हेक्टरचा भराव, बीएमसीटीपीएल च्या रस्त्यासाठी १९.५ हेक्टरचा भराव,पार्किंगसाठी ५०० हेक्टर भराव, जेएनपीटी सेझ साठी ३०० हेक्टर भराव, बीएमसीटीपीएल फेज २ साठी ११० हेक्टर भराव, रस्ते रुंदीकरणासाठी भराव असे मासेमारी जमिनीत भराव करून तयार केलेल्या जमिनीच्या समोर मासेमारी जमिनीत सुमारे ६ किलो मीटर लांबीचे माल चढ उतार करण्यासाठी धक्के व त्या धक्यावरून जहाजात माल भरण्यासाठी त्या धक्क्यांना जागोजागी अनेक पोच रस्ते बांधले आहेत. आणि धक्क्यांचे समोर मासेमारी जमिनीत मालवाहू जहाजे लावण्यासाठी व फिरवण्यासाठी खुदाई करून खोली केलेली आहे. यामुळे मच्छिमारांवर बेकारीची वेळ आली आहे. याबाबत केंद्र आणि राज्य सरकारला काहीच देणे-घेणे नाही. याविरोधात ग्रामस्थ आक्रमक असून, दि. २२ जानेवारी २०२५ रोजी जेएनपीएचे समुद्रमार्गे चॅनेल बंद आंदोलन करणार असल्याचे जाहीर केलेले आहे. त्यासाठी कोकणातील सर्व संस्थांनी बोटी/होड्या घेवून यावे आणि कोळी समाजाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन शेवा कोळीवाडा सामाजिक ग्रामविकास मंडळ तसेच शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेच्यावतीने करण्यात आले आहे.

# ज्येष्ठांसह आदिवासींना ब्लँकेटचे वाटप

**। रसायनी । वार्ताहर ।**




भारतीबेन रमणिकलाल शाह चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्यावतीने ठिकठिकाणी ज्येष्ठ नागरिक व अधिवासी बांधवांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. यावेळी मोहोपाडा, कोटवलवाडी, गोरेवाडी, धामसेवाडी, विठ्ठलवाडी, भोमलवाडी, चिंचवाडी, खांडस, नांदगाव आदी परिसरातील ज्येष्ठ नागरिक व आदिवासी बांधवांना भारतीबेन रमणिकलाल शाह चॅरिटेबळ ट्रस्टच्या ट्रस्टी शैलेश शाह, रांजन शाह, धवल सावळा यांच्यावतीने वाटप करण्यात आले. यावेळी राकेश चव्हाण, बाळू खाडे, प्रेम आयंगर आदी उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिक व आदिवासी बांधवांना ऐन थंडीच्या दिवसात ब्लँकेट मिळाल्याने त्यांनी भारतीबेन रमणिकलाल शाह चॅरिटेबल ट्रस्टचे आभार मानले.

# उरण सामाजिक संस्थेचा पुरस्काराने सन्मान

**। उरण । वार्ताहर ।**

टी.एम.जी क्रिएशन आणि एनोवेटिव्ह मानबिंदू प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने ललकारी सन्मानाची अनुभूती महागौरव संमेलनाचे आयोजन रविवारी (दि. २९) मुंबई मराठी पत्रकार संघ, मुंबई येथे करण्यात आले होते. यावेळी राज्यभरातील समाजसेवी संस्था तसेच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील विविध मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. स्मृतीचषक, सन्मानपत्र, पदक (मेडल) असे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी रायगड जिल्ह्यातील उरण सामाजिक संस्थेच्या कार्याचा गौरव करत पुरस्कार प्रदान करण्यात आला.

उरण सामाजिक संस्थेकडून संतोष पवार, काशिनाथ गायकवाड, प्रा. राजेंद्र मढवी, रुपेश पाटील, वैभव पाटील यांनी कर्नल रवीद्र त्रिपाठी, ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे, अभिनेता अभंष कुमार यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला.

यावेळी उरण सामाजिक संस्थेचे सरचिटणीस संतोष पवार यांनी संस्थेचे अध्यक्ष शेतकरी नेते सुधाकर पाटील यांच्या कार्याचा गौरव करत हा सन्मान संस्थेच्या कार्यकर्त्यांचा असल्याची भावना व्यक्त केली. यावेळी संस्थेच्या वतीने पुरस्कार घेण्यासाठी आलेल्या प्रा. राजेंद्र मढवी, काशिनाथ गायकवाड, रुपेश पाटील, वैभव पाटील आदींच्या कामाची माहिती संतोष पवार यांनी या पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने उपस्थितांना करून दिली.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● **वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे** N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९

● **किहीम, रायगड.. समुद्रकिनाऱ्यापासून** ३५० मीटर अंतरावर ३५० मिटर चा प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.१.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्या साठी योग्य - ९८२२२५७९२९

● **अलिबाग शहर येथील** हॉस्पिटलमध्ये नर्सची आवश्यकता आहे. संपर्क ९८५०३४८५०६, ९८२२४०९८४९.

● **रिसॉर्ट भाड्याने देणे आहे.** ६ A/c Rooms, किचन हॉल स्विमिंगपुल नारळाची वाडी पार्किंगसह (एकूण क्षेत्र १० गुंठे) संपर्क- ८३२९१७५७९१ ठिकाण आक्षी (रायवाडी)

● **अलिबागमध्ये नामांकित** टू व्हीलर शोरुममध्ये अनुभवी मॅकेनिक पाहिजे व शोरुममध्ये काम करायला बाई पाहिजे. (संपर्क : ७५१७७०१८५८/९८२२०६३१६६)

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## श्रीकृपा इंग्लिश मीडियम स्कूल रेवदंडाचे स्नेहसंमेलन उत्साहात

# चिमुकल्यांच्या नृत्याविष्कारांनी जिंकली मने

## उपस्थितांकडून टाळ्या अन् शिट्यांनी दाद, पालकही भारावले

**। चौल । प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथील श्रीकृपा इंग्लिश मीडियम स्कूल, रेवदंडाचे वार्षिक स्नेहसंमेलन येथील हरेश्वर मंदिराच्या प्रांगणात शुक्रवारी (दि. २७) जल्लोषात पार पडले. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर करुन उपस्थितांची मने जिंकत उत्स्फूर्त दाद मिळविली. आपल्या पाल्याची थिरकणारी पावले पाहताच उपस्थित पालकही भारावून गेले होते.**



कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून रेवदंडा ग्रामपंचायतीचे सरपंच प्रफुल्ल मोरे, दुष्यंत झावरे उपस्थित होते. यावेळी स्कूल कमिटी सभासद आशा शेळके, स्वरुपा मानकर, शैलेश मानकर यांच्यासह स्कूलच्या मुख्याध्यापक रिया झावरे उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन व गणेशपूजनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. दरम्यान, मान्यवरांचा स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वागत नृत्य सादर केले. तसेच कोळीनृत्य, पारंपरिक सण उत्सव आदी विषयांसह विविध कलाविष्कारांचे कार्यक्रम सादर करुन उत्स्फूर्त दाद पटकाविली.

याप्रसंगी शैक्षणिक वर्षात अभ्यास, कला व क्रीडा क्षेत्रात विशेष नैपुण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना स्मृतचिन्हे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजिरी गधानी आणि सुनील शेळके यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंकिता नाईक, निधी गुप्ता, अक्षता घरत, भाग्यश्री टेकाळकर, प्रीती म्हात्रे या शिक्षिकांसह शिक्षकेतर कर्मचारी संगिता गोंधळी, संपदा मानकर यांनी मेहतन घेतली. त्यांचाही मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. दरम्यान, मुख्याध्यापिका रिया झावरे यांनी स्कूलच्या कार्याचा आढावा घेतला व पालकांशी संवाद साधला.

> **आजच्या स्पर्धात्मक युगात वाटचाल करताना चिमुकल्यांचा शैक्षणिक पाया मजबूत करण्याचे काम श्रीकृपा इंग्लिश मीडियम स्कूल करत आहे. ही स्कूल मुलांना सर्वांगीण विकासाचे सुसंस्कारित शिक्षण देत आहे, हे निश्चितच कौतुकास्पद आहे.**
> **– ॲड. मनिषा नागावकर, लोहार, पालक**

> **प्रत्येक आईवडिलांची इच्छा असते की, आपल्या पाल्याला उत्तम इंग्रजी लिहिता, वाचता यावे. परंतु, सर्वांची मोठ्या शाळांमध्ये टाकण्याची ऐपत नसते. समाजातील तळागाळातील अशा घटकांचा विचार करुन शाळा सुरु करुन त्या पालकांचे स्वप्न सत्यात उतरविण्याचे काम श्रीकृपा इंग्लिश मीडियमच्या माध्यमातून सुरु आहे. पालकांचाही चांगला प्रतिसादत मिळत असून, हाच विश्वास यापुढेसुद्धा राहील, याची खात्री वाटते.**
> **– रिया झावरे, मुख्याध्यापक, श्रीकृपा इंग्लिश मीडियम स्कूल, रेवदंडा**

# पाणीपुरवठा योजना अद्यापही अपूर्णावस्थेत

## १८ ठिकाणी जागेची अडचण

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेची कामे अद्यापही अपूर्ण स्थितीत आहेत. तालुक्यात १८ ठिकाणी जागेची अडचण आहे. जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजना सुरू झाल्यापासून काही ठिकाणी शुक्लकाष्ट मागे लागले असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे योजना पूर्ण होऊ शकली नाही.

अजिवली येथे वरची टाकी बांधण्यासाठी ग्रामपंचायत इकडून जागा उपलब्ध करून देण्यात आली नाही. बारापाडा येथे देखील जागा ग्रामपंचायतीकडून उपलब्ध करून देण्यात आली नाही. चेरवली येथे ग्रामपंचायतकडून जागा देण्यात आलेली नाही. सांगटोली येथील जागा वनविभागाची असून वन विभागाला प्रपोजल देण्यात आलेला आहे. शिवकर आणि वडघर येथील टाकी बांधण्यासाठी ग्रामपंचायतीकडून जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. आपटे येथे खालील टाकी बांधण्यासाठी ग्रामपंचायतकडूनजागाउपलब्धनाही. तर डोलघर येथे मुख्य पाईप लाईन टाकण्यासाठी ग्रामपंचायतीकडून जागा देण्यात आलेली नाही. गुळसुंदे आणि न्हावे या ठिकाणी वरची टाकी बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही. लोणीवली येथे वरची टाकी बांधण्यासाठी जागा खाजगी आहे की वनविभागाची आहे हे ग्रामपंचायतीने कळवलेले नाही.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत सदरील मिळकतीच्या विद्यमान मालक सौ.दया मधुकर ढेबे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविलेले आहे व त्याप्रमाणे उभयपक्षी साठेकरारनामा ता. १८/१०/२०२४ रोजी स्वाक्षरीत झालेला आहे व आमच्या अशीलांनी सदरील व्यवहारापोटी बयाणा रक्कमही मिळकतीचे मालकांना अदा केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| मौजे भातसई, ता. रोहा, जि. रायगड. | ३८८ | ०-५८-००<br>०-१९-००<br>(पो.ख.) | ०.४९ |

ज्यासी चतु:सिमा
पुर्वेस :-गट नं. ३९१ व गट नं. ३८७
पश्चिमेस :-गट नं. ३९८ व गट नं. ३८३
उत्तरेस :- गट नं. ३९०
दक्षिणेस :- गट नं. ३८५

तरी सदरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, वहिवाट, कुळ, ताबा, कब्जा, तारणगहाण, लिज, लिन, साठेकरार, बोजा, वहिवाटीचे मार्ग अथवा इतर कसल्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रांसह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत सादर करावी. वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदरील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही हे कळावे.

अलिबाग,
दिनांक : ३१/१२/२०२४

सही/-
**ॲड. जयेश अ. जोशी**
९३२, टिळक रोड, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

---

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस ह्या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे बांगमाडले, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. चंद्रशेखर चंद्रकांत साबणे, यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र-(हे.आर.चौ.मी) | आकार -(रु.पै.) |
|---|---|---|---|
| बांगमाडले, ता. श्रीवर्धन, जि. रायगड | ३८६ | १-१७-०० पैकी<br>०-४०-०० | ०.५३ |

अलिबाग,
दि. ३०/१२/२०२४

सही/-
**ॲड.महेश सुहास म्हात्रे**
नावनोंदणी क्रमांक एमएएच/५७७३/२००६
ऋतुराज प्लाझा, तळमजला,
फ्लॅट क्रमांक १. शिवाजी चौक,
गावडे ऑप्टिक्स जवळ,
अलिबाग रायगड

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कावाडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सविता काशिनाथ नाईक, २) श्री. शेखर काशिनाथ नाईक, ३) श्री. प्रशांत काशिनाथ नाईक, ४) निलम चंद्रकांत कोदे, ५) उज्वला शरद पाटील, ६) वनिता शिवराम नाईक, ७) शर्मिला उर्फ राजलक्ष्मी शैलेश घरत व ८) उर्मिला शिवराम नाईक उर्फ उर्मिला दिनेश पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| कावाडे | ३० | ०-४०-८०<br>पो.ख.०-०५-२०<br>०-४६-०० | ११.२२ |

सदरची मिळकत ही त्यांचे निवेंध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात, मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : ३१/१२/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, रायगड, ४०१ २०१.

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे झिराड ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकतीचे विद्यमान मालक हर्षला हरिश्चंद्र म्हात्रे, शुभांगी शरद कवळे यांचेसोबत माझे अशिलांनी व्यवहाराबाबत बोलणी केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| झिराड ता. अलिबाग, जि. रायगड | ३८ | एकुण क्षेत्र ०-४६-०० | ०.७० |

सदर मिळकतीतील हर्षला हरिश्चंद्र म्हात्रे, शुभांगी शरद कवळे यांच्या मालकीचे ०-२०-०० हे. आर. पॉ. आकार ०.३३ हे क्षेत्र या नोटीशीचा विषय आहे.

वर नमुद केलेल्या मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्न, वस्त्र, साठेकरार, कोर्ट जप्ती अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदपत्रे घेऊन येऊन हरकती नोंदवून खात्री पटवून द्यावी. अन्यथा मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही. कळावे.

अलिबाग,
तारीख : ३१/१२/२०२४

**(ॲड. निकेत रामचंद्र चवरकर)**
बी.ए.एल.एल.बी
मु. त्रिवेणी कॉम्प्लेक्स, रूम नं. ८
रोहिदास नगर चेंढरे
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९०४९४९२३८०

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांनबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :**
**मौजे - मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | प्लॉट नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| संदीप चंद्रकांत पारकर | १९/१अ | ९ | १-६८-०० | ३ | ३६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : ए विंग, फ्लॅट नं. ४, चौथा मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१

सही /-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ३१/१२/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल:- .adv.jayeshmhase@gmail.com

---

### जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गांव कावीर येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत ७/१२ कडील वर्णनानुसार अश्विनी अशोक भगत, हर्षल अशोक भगत आणि वृषाली अभिजीत पाटील यांचे मालकीची असून, सदर जमिन विकत घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २९३ | - | १-५५-६<br>पो.ख. ०-२४-९<br>१-८०-५ | ३८-११ |

सदर मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | गट नंबर ४८० ही मिळकत |
| पश्चिमेस | : | गट नंबर ५१२ ही मिळकत |
| दक्षिणेस | : | गट नंबर ३१५ ही मिळकत |
| उत्तरेस | : | गट नंबर २९० ही मिळकत |

तरी सदर मिळकतीच्या ७/१२ उतारयावर नांव असणाऱ्या मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, वहिवाटीचा हक्क जप्ती अगर तत्सम अन्य प्रकारचा हक्क या मिळकतीवर असल्यास किंवा सदर मिळकतीबाबत महसूल कोर्ट अगर दिवाणी कोर्टात कोणताही वाद निर्णित झाला असेल अथवा प्रलंबित असेल असे कोणाचेही म्हणणे असल्यास आणि वर नमूद केलेल्या मालकांच्या हक्काबाबत कोणाचीही कोणत्याही स्वरूपाची हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत नोंदवावी. त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

तारीख : ३०/१२/२०२४

सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा को ऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग, रायगड.
९२७०१६२९२९/९४२२६८९१७०

---

प्रोसेस जमा रू.

अर्जदारांतर्फे वकील
ॲड.संजय दत्तात्रेय म्हात्रे
निशाणी क्रमांक ७/ड

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात.**
**दिवाणी चौकशी अर्ज क्र.२३३/२०२४**

सौ. सुहासिनी सुरेश पाटील — अर्जदार
विरूद्ध,
कोणीही नाही

सर्व लोकांना या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेंत येते की, सौ. सुहासिनी सुरेश पाटील यांनी कै. समिर सुरेश पाटील रा. सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नावे भारतीय आयुर्विमा महामंडळची पॉलीसी क्र. ९०५५१९०६५ रक्क्म रुपये ५०,०००/- मात्र ची पॉलीसी आहे. कै. समिर सुरेश पाटील यांचा वारस दाखला मिळणे करीता अर्जदार यांनी मे. न्यायालयात इंडियन सक्सेशन ॲक्टचे कलम ३७२ अन्वये अर्ज केला आहे.

सदर अर्जदारांव्यतिरीक्त अन्य कोणाचाही सदर पॉलिसीच्या रक्कमेमध्ये कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध नाही तसेच अर्जदार यांचे व्यतिरीक्त अन्य कोणीही कै. समिर सुरेश पाटील यांना वारस नाहीत. असे अर्जदार यांचे कथन आहे.

अर्जदार यांचे व्यतिरीक्त अन्य कोणाचेही वर नमुद पॉलिसीमध्ये कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा कै. समिर सुरेश पाटील यांचे अन्य कोणीही वारस असल्यास त्यांनी या न्यायालयांत दिनांक २७/०१/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता समक्ष अगर योग्य ते अधिकार व माहिती दिलेल्या प्रतिनिधीमार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. दिनांक २७/०१/२०२५ रोजी या जाहिर नोटीसला अनुसरून अन्य कोणीही आपला हक्क अधिकार सांगितला नाही तर हे न्यायालय अर्जदार यांचे लाभात वर नमुद मिळकतींबाबत वारस दाखला जारी करणेची पुढील कार्यवाही करेल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.केले.

आज रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व माझे सहीनिशी जाहीर केले.
दि. ३०/१२/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अलिबाग**

---

### अलिबाग नगरपरिषद

**फेर निविदा सुचना**

मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद, अलिबाग-रायगड खाली नमूद केलेल्या कामांसाठी मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून-जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नांव | इसारा रक्कम | कालावधी व वेळ | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | स्टॅन्ड पोस्ट कोळीवाडा ते गणेश तांडेल यांच्या घरापर्यंत 90 mm HDPE पाण्याची पाईप लाईन नवीन टाकणेबाबत. | २०००/- | ३१/१२/२०२४ ते ०७/०१/२०२५ निविदा फार्म देण्यात येईल वेळ-सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० पर्यंत | ५००/- |

सुचना :- वरील कामाबाबतची अधिक माहिती पाणीपुरवठा विभागात संपर्क केल्यास देण्यात येईल.

**(सचिन बच्छाव)**
**मुख्याधिकारी,**
**अलिबाग नगरपरिषद.**

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांनी त्या मिळकतींचे मालक श्री. अशोक बाळकृष्ण पाटील व श्री. निलेश अशोक पाटील यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे भोईरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर/चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ४८ | २ | ०.२२.०० | २.६९ |

तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबाकबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी / हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ३१-१२-२०२४

**ॲड.दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं- ९५६१७१९४९४
९०११७१६००१

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यांत येते की, :-

मौजे विहूर, ता.मुरुड, जिल्हा रायगड येथील खालीलप्रमाणे हक्क नोटीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी संबंधित कब्जेदार १) अरविंद गणपत दळवी, २) सुभाष गणपत दळवी, ३) दिलीप गणपत दळवी, ४) तारामती हरिश्चंद्र येलकर, ५) तारामती हरिश्चंद्र महाडीक, ६) वासंती दत्ताराम मोरे, ७) सरस्वती गणपत दळवी, ८) अशोक गणपत दळवी, ९) महेश गणपत दळवी, १०) आशा सतिश शिंदे यांचेकडून आमचे अशिल १) शमीम अब्दुलकादर नाखवाजी, २) शहाजहान अनीस नाखवाजी, ३) मेहजबीन रिजवान मिरा यांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| गट क्र . | खाते नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. | गांव |
|---|---|---|---|---|
| २७० | ४८ | एकुण क्षेत्र ०.६८.०० पैकी ला ला ०.२९.९० पो.ख. ०.०४.१० एकूण ०.३४.०० | ४-५० | विहूर, ता. मुरुड |

सबब सदर वरील वर्णनाच्या जमीन मिळकतींपैकी संबंधीत कब्जेदार यांचे मालकी, हिश्श्याची क्षेत्र ०-३४-०० हे. आर. पॉ. या जमीन मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात, याप्रमाणे कोणाचीही, कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजाविरहित व खरेदी घेण्यास योग्य आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत, असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे,

ठिकाण : मुरूड-जंजिरा.
दिनांक ३०/१२/२०२३

सही/-
**अन्वर ए. हुसेन**
ॲडव्होकेट
रा.एस.टी.डेपो जवळ, दत्तमंदिर रोड,
मुरूड-जंजिरा, जि.रायगड.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. अल्ताफ लियाकत डोंगरे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री.राहील कबीर शेख यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णनः**
**मौजे. भडवळ, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. चौ. मी. | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|
| ३६ | १/अ | ०-२०-५०<br>पो.ख. ०-०५-००<br>एकुण ०-२५-५० | ० | १७ |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांकः ३०/१२/२०२४
पत्ताः मु. पो. मानिवली, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०१०१
मो. ९०११९०१७२०

सही/-
**ॲड. सतिश जयराम गवळी**
(वकिल उच्च न्यायालय)

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे आशिलांनी गाव मौजे तमनाथ, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील नमूद केलेली मिळकत त्याचे समोर नमुद मालकांकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे तमनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील अधिकार अभिलेखात खालीलप्रमाणे नमूद असणारी बिनशेती मिळकत**

| भोगवटादार | सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| उर्मिला श्याम जयसिंग | २८ | २/अ/१ | २-८०-०० | २८.०० |
| उर्मिला श्याम जयसिंग | २८ | २/अ/९ | ३-००-०० | ३०.०० |
| श्याम एम जयसिंग | २८ | २/अ/७ | २-९४-०० | २९.४० |

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, बक्षिस साठेकरार, फरोक्त, कुळ, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, अतिक्रमण वगैरे प्रकारचा हक्क हितसंबंध अगर बोजा असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदारांचे वकील यांच्याकडे आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली नमूद पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने दाखल करावयात. वरील मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत. असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून उपस्थित होणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

ठिकाण: कर्जत
दिनांक ३१/१२/२०२४

खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
**ॲड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
पत्ता कोर्ट व्हिव बिल्डींग, सदनिका क्रं. १०१
कर्जत दिवाणी न्यायालयासमोर कर्जत रायगड
मो.नं. ९६०४५४५७७७

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)
ज.म. र अर्ज ९२/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. राजेंद्र मधुसुदन कुंटे
मु. ५, शांतादुर्गा, को. ऑप. हौसिंग, सोसा. मारुती नाका, ता.अलिबाग, जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

१. अलिबाग नगरपरिषद तर्फे मा.मुख्याधिकारी, ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला
२. चित्रा मधुसुदन कुंटे
३. सौ आशा मिलिंद जोगळेकर
४. अरुणा अच्युत आठवले

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१. अर्जदार यांची आई कै. सुलभा मधुसुदन कुंटे यांचा मृत्यु दि. २३/७/२०२२ रोजी राहत्या घरी मौजे - अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड येथे झाला आहे.
२. मृत्युची नोंद अलिबाग नगरपरिषद याचे कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यु नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११(२)व (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.
३. मात्र यांचा मृत्यु नोंद अलिबाग नगरपरिषद येथे केलेली नसल्याने त्यांना मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यु नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी नगरपरिषद अलिबाग यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.७/०१/२०२५ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. १०/१२/२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.
ठिकाण : अलिबाग
तारिख : /१२/२०२४

सही-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

---

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, दि.२७/१२/२०२४ रोजीच्या दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये ॲड. विजयालक्ष्मी एन.साईनी यांनी मिळकतीचे खरेदीदार यांच्यातर्फे खालील मिळकतीच्या हस्तांतरणाविषयी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी, ता.अलिबाग, जि.रायगड | १९० | २-५४-७०<br>पो.ख. ०-४१-५०<br>एकूण २-९६-२० | १२.२६ |

वर नमूद मिळकतीमधील श्री.रंजन दिनकर पाटील, सौ.प्रेरणा प्रभाकर म्हात्रे, सौ. वैशाली भालचंद्र साने, सौ.सुनिता मनोहर राऊळ, सौ. निलीमा निळकंठ पाटील यांचा असलेला अविभक्त हिस्सा.

असे असले तरी, सदरहू नोटीसीस आमचे अशिल श्री. उल्हास पंढरीनाथ काठे, श्री. कैलास पंढरीनाथ काठे, श्री. हरेश पंढरीनाथ काठे, श्री. राजेश पंढरीनाथ काठे सर्व रा.मु.म्हात्रोळी, पो. सारळ, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी हरकत घेण्यास सांगितले, त्यांच्या सांगण्यावरुन व त्यांनी दिलेल्या माहितीवरुन दि.२७/१२/२०२४ रोजीच्या जाहीर नोटीसीस हरकत वजा उत्तर खालीलप्रमाणे.

१) मौजे म्हात्रोळी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नं. १९० ही मिळकत पुर्वी मौजे म्हात्रोळीपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथे सर्व्हे नं. ४०/५, ४१/०, ४२/१/२ व ४३/११ ने ओळखली जात होती. असे असले तरी सदरहू मिळकत ही जानू कृष्णा काठे व गोविंद बाळू काठे यांच्या सामाईक मालकीची होती, तशी ७/१२ दप्तरी नोंद आहे.

२) गोविंद बाळू काठे हे सन १९६६ साली मयत झाले. त्यानंतर त्याच्या सदरहू मिळकतीस एकत्र कुटुंब पुढारी म्हणून श्री. गजानन बाळू काठे यांच्या नावची नोंद झाली. तत्पूर्वी गोविंद बाळू काठे यांनी त्यांच्या हिश्श्याची सदरहू मिळकतीपैकी म्हणजेच जुना सर्व्हे नं. ४०/५ (११५/५) पैकी सुमारे ०-६०-० हे. आर. इतक्या क्षेत्राची मिळकत त्यांचा पुतण्या श्री. पंढरीनाथ लक्ष्मण काठे यांस कसण्यास दिली. त्यानंतर श्री. पंढरीनाथ लक्ष्मण काठे हे दि.११/०९/२०१४ रोजी मयत झाले. श्री. पंढरीनाथ लक्ष्मण काठे हे मयत झाल्यानंतर सदर मिळकत ही श्री. पंढरीनाथ लक्ष्मण काठे यांचे मुलगे यांच्या ताबेकब्जे वहिवाटीत आली व आजतागायत आहे. सदरहू मिळकतीमध्ये श्री. पंढरीनाथ लक्ष्मण काठे हे भाताचे पिक घेत होते व त्यानंतर त्यांचे मुलगेसुध्दा सन २०२० सालापर्यंत भाताचे पिक घेत होते. त्यानंतर मिळकतीमध्ये जंगली प्राणी हे भाताच्या पिकाचे नुकसान करत असल्यामुळे श्री.पंढरीनाथ लक्ष्मण काठे यांच्या मुलांना भातचे पिक घेता आले नाही. असे असले तरी सदरहू मिळकत ही श्री.पंढरीनाथ लक्ष्मण काठे यांचे मुलगे यांच्याच आजतागायत ताबेकब्जे वहिवाटीत व कसवणुकीत आहे.

३) मौजे म्हात्रोळी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नं.१९०, एकूण क्षेत्र २-९६-२० हे.आर., आकार १२.२६ रु.पै. या मिळकतीपैकी ०-६०-० हे. आर. इतक्या क्षेत्राची मिळकत श्री. पंढरीनाथ लक्ष्मण काठे यांच्या ताबेकब्जे वहिवाटीत व कसवणुकीत सन १९६६ सालापुर्वीपासून व त्यांच्या निधनानंतर त्यांचे मुलगे यांच्या ताबेकब्जे वहिवाटीत व कसवणूकीत आहे. श्री. पंढरीनाथ लक्ष्मण काठे हे सदरहू मिळकतीचे ताबेकब्जे वहिवाटीने मालक झालेले आहेत व त्यांच्या निधनानंतर त्यांचे मुलगे हे सदरहू मिळकतीचे मालक झालेले आहेत.

४) सदरहू मिळकतीसंदर्भात दि.२३/११/२०२३ रोजी दैनिक कृषीवल व दैनिक रत्नागिरी रायगड टाइम्स या वृत्तपत्रांमध्ये नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर व नोटीसीस सविस्तर उत्तर दिल्यानंतर आमच्या अशिलांनी दि.२८/०२/२०२४ रोजी अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात ठरावाकरीता व इतर मागण्यांकरीता श्री.रंजन दिनकर पाटील, सौ.प्रेरणा प्रभाकर म्हात्रे, सौ. वैशाली भालचंद्र साने, श्री. विश्वनाथ जानू काठे, सुनिता मनोहर राऊत, सौ. निलिमा निळकंठ पाटील, श्री. मोहन दिनकर पाटील, श्री. गणेश दिनकर पाटील व श्री. अशोक दिनकर पाटील यांच्याविरूद्ध स्पेशल मुकदमा नं.१६/२०२४ ने दावा दाखल केलेला आहे. सदरहू दाव्यामध्ये सर्व पक्षकार हे वकीलांमार्फत हजर झालेले आहेत. सदरहू दावा हा प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे.

५) तरी मौजे म्हात्रोळी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नं.१९०, एकूण क्षेत्र २-९६-२० हे.आर., आकार १२.२६ रु.पै. या मिळकतीपैकी ०-६०-० हे.आर. इतक्या क्षेत्राच्या मिळकतीविषयी स्पेशल मुकदमा नं. १६/२०२४ प्रलंबित असताना खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्यास आमचे अशिल हे जमिन मालक व खरेदीदार यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करतील व होणाऱ्या सर्व परिणामांस तथाकथित जमिन मालक व खरेदीदार हेच जबाबदार राहतील. सदरहू मिळकतीच्या मालकी हक्काविषयी वर नमूद वस्तुस्थिती असल्यामुळे आमचे अशिलांची सदरहू मिळकतीच्या हस्तांतरणास सक्त हरकत आहे.

अलिबाग.
दि. ३०/१२/२०२४.

सही/-
**ॲड. सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को. ऑप.हौ.सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९८६७७१५५२४

निवडक

## अनुष्काची विजयी खेळी

**नवी दिल्ली :** सिनियर वूमेन्स वन-डे ट्रॉफी स्पर्धेत बंगालविरूद्धच्या अंतिम सामन्यात अनुष्का शर्माने अर्धशतकी खेळी करत मध्य प्रदेशच्या पारड्यात विजय खेचून आणला. बंगालने प्रथम फलंदाजी करत मध्य प्रदेशला विजयासाठी १३७ धावांचे आव्हान दिले. मध्य प्रदेशने ३४.४ षटकात लक्ष्याचा यशस्वी पाठलाग केला. ज्यामध्ये अनुष्का शर्मा (६९) व आयुषी शर्माने (३०) धावांची नाबाद खेळी करत सामना ७ विकेट्सने जिंकला. मध्य प्रदेशने पहिल्यांदाच सिनियर वूमेन्स वन-डे ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे.

## जसप्रीत बुमराहचे नामांकन

**नवी दिल्ली :** जसप्रीत बुमराहच्या कारकिर्दीत २०२४ हे वर्ष महत्त्वाचे ठरले आहे. बुमराहने या वर्षी अनेकवेळा विक्रमी कामगिरी केली. त्यामुळे जगभारातून निवडलेल्या ४ खेळाडूंमध्ये बुमराहचा समावेश करण्यात आला असून रूट (इंग्लंड), ट्रॅव्हिस हेड, (ऑस्ट्रेलिया), हॅरी ब्रुक (इंग्लंड) या खेळाडूंचा समावेश आहे. आयसीसी मेन्स कसोटी क्रिकेटर ऑफ द इयर त्याचबरोबर आयसीसी मेन्स क्रिकेटर कसोटी क्रिकेटर ऑफ द इयर पुरस्कारासाठी देखील बुमराहला नामांकन मिळाले आहे.

## क्रिकेट खेळताना मृत्यू

**जालना :** क्रिकेटमध्येही फिटनेसला आता प्रचंड महत्त्व दिले जातं आहे. मात्र, असे असतानाही गेल्या काही वर्षात मैदानात हृदयविकाराचा झटका आल्याने खेळाडूंना जीव गमवावा लागल्याच्या घटना घडत आहेत. आता पुन्हा महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यातील एका तरुणाला क्रिकेट खेळताना प्राण गमावावा लागल्याची घटना घडली आहे. सोमवारी ३२ वर्षांच्या विजय पटेल या तरुणाला हृदयविकाराचा झटका आल्याने प्राण गमवावे लागले आहे. क्रिकेट खेळतानाच त्याने मैदानावर जीव सोडला.

## द. आफ्रिका फायनलमध्ये

**केप टाऊन :** दक्षिण आफ्रिका विरुद्ध पाकिस्तान संघात सेंच्युरियनमध्ये रोमांचक बॉक्सिंग डे कसोटी सामना झाला. दक्षिण आफ्रिकेने चौथ्या दिवशी २ गडी राखून विजय मिळवला आहे. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने २ सामन्यांच्या कसोटी मालिकेच १-० अशी आघाडी घेतली आणि त्याचसोबत आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप स्पर्धेच्या फायनलमध्ये प्रवेश निश्चित केला आहे. दक्षिण आफ्रिकेने विजय निश्चित केल्याने आता फायनलमध्ये ऑस्ट्रेलिया किंवा भारत या दोन्ही पैकी एकच संघ जागा मिळवू शकतो.

## जैसवालची एकहाती खेळी

**नवी दिल्ली :** भारतीय संघाला २०२४ वर्षाच्या शेवटच्या कसोटी सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. ऑस्ट्रेलियाच्या ३४० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताला १५५ धावा करता आल्या. २०२४ मध्ये भारताने १५ पैकी ८ कसोटी सामने जिंकले, परंतु ६ मध्ये त्यांना हार पत्करावी लागली आहे. १ सामना ड्रॉ राहिला आहे. पण, भारताच्या या प्रवासात यशस्वी जैस्वाल याने फलंदाजीत एकहाती किल्ला लढवल्याचे पाहायला मिळत आहे.

### कुमारी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# ठाणे संघाचा यशस्वी प्रतिकार

**। सांगली । क्रीडा प्रतिनिधी ।**

**महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. च्या मान्यतेने, युवक मराठा मंडळाच्या सहकार्याने सांगली जिल्हा कबड्डी असो.ने कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन सांगलीतील सांगलीवाडी येथील चिंचबाग मैदानावर करण्यात आलेले आहे. या स्पर्धेत पिंपरी-चिंचवडसह अहमदनगर, पुणे ग्रामीण यांनी कुमारी गटाची उपांत्य फेरी गाठली आहे. ठाणे शहरला उपांत्य फेरी गाठण्यासाठी झुंजावे लागले.**

पहिल्या सामन्यांत पिंपरी-चिंचवडने नाशिक ग्रामीणचा ३७-१९ असा पराभव केला. आक्रमक सुरुवात करीत पहिला लोण देत २३-१० अशी पहिल्या डावात आघाडी घेणाऱ्या पिंपरी-चिंचवडने दुसऱ्या डावात देखील आणखी एक लोण देत सामना आपल्या नावे केला. दुसऱ्या सामन्यात अहमदनगरने मुंबई शहर पूर्ववर ४५-१३ असा सहज विजय मिळविला. पूर्वार्धात २ लोण देत २३-०६ अशी आघाडी घेणाऱ्या नगरने उत्तरार्धाच्या खेळात देखील आणखी दोन लोण देत ३२ गुणांच्या फरकाने सामना आपल्या खिशात टाकला.





तिसऱ्या सामन्यात पुणे ग्रामीणने जालनाचा दुबळा प्रतिकार ५१-१३ असा संपविला. मध्यांतरापर्यंत २ लोण देत २५-०८ अशी आघाडी घेत पुणे ग्रामीणने विजयाचा भक्कम पाया रचला. मध्यांतरानंतर आणखी २ लोण देत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. चौथ्या आणि थरारक सामन्यात ठाणे ग्रामीणने ५-५ चढायांच्या डावात परभणीच्या कडवा प्रतिकार ३८-३४ असा मोडून काढत उपांत्य फेरी गाठली. पहिल्या डावात १०-१८ अशा गुणांनी पिछाडीवर पडलेल्या ठाण्याने पूर्ण डावात परभणीला २९-२९ असे रोखले. नंतर ५-५ चढायात ९ गुण घेत बाजी मारली. परभणीने दुसऱ्या डावात लोण देत व पूर्ण डावात ४ बोनस करीत शर्थीचे लढत दिली. ठाण्याने पूर्ण डावात ११ बोनस गुणाची कमाई करीत सामन्यात बरोबरी साधली.

या अगोदर झालेल्या उपउपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यांत पिंपरी-चिंचवड वि. मुंबई शहर पश्चिम ३४-२४, नाशिक ग्रामीण वि. नंदुरबार ३९-३७, अहमदनगर वि. पुणे शहर ३५-३४, मुंबई शहर पूर्व वि. मुंबई उपनगर पूर्व २३-२१, पुणे ग्रामीण वि. रायगड ४९-१२, जालना वि. सांगली ३९-३७, ठाणे शहर वि. पारघर ४२-३९, परभणी वि. कोल्हापूर ३१-२४ हे संघ विजयी झाले आहेत.

## सुहित जीवनच्या विद्यार्थ्यांचे यश




**। खरोशी । वार्ताहर ।**

ॲक्वा लाइफ स्विमिंग क्लब व ग्लोरियस स्पोर्ट्स ॲकॅडमी जलतरण स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि.२९) मामा वास्कर जलतरण तलाव येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत पेण येथील सुहित जीवन ट्रस्टच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सहभाग घेऊन पदकांसह सन्मान मिळवला आहे. या स्पर्धेत प्रचिती म्हात्रे व प्रणित भगत यांनी सुवर्णपदक व प्रमाणपत्र, तर अर्णव झावरे याने रौप्यपदक व प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. या विद्यार्थ्यांचे त्यांचे पालक व प्रशिक्षकांचे संस्थेतर्फे अभिनंदन करण्यात आले आहे. याबद्दल आयोजकांचेही आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

# रायगड जिल्ह्याचा संघ जाहीर

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट असो. च्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या खुल्या गटातील आंतरजिल्हा निवड चाचणी टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी रविवारी (दि.२९) रायगड जिल्ह्याच्या संघ जाहीर करण्यात आला आहे. यात पेण स्पोर्ट्स असो.चा अष्टपैलू खेळाडू सिद्धांत म्हात्रेची कर्णधार म्हणून, तर अलिबाग क्रिकेट अकॅडमी संघाचा तंत्रशुद्ध फलंदाज ऋषिकेश राऊत याची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा क्रिकेट असो.ने जाहीर केलेल्या संघात सिद्धांत म्हात्रे (कर्णधार), हृषिकेश राऊत (उपकर्णधार), श्रेयस कुमार, ओम जाधव (यष्टीरक्षक), देवांश तांडेल, समीर आवास्कर, प्रतीत गोटसुर्वे (यष्टीरक्षक), चैतन्य पाटील, संतोष गोस्वामी, ओंकार महाडिक, मिहिर भाटकर, तेजस मोहिते, कौस्तुभ म्हात्रे, नसीब नाईक यांना स्थान मिळाले आहे. तर, राखीव खेळाडू म्हणून अभिषेक खातू, साई साखरकर, तहा चिचकर, कौस्तुभ चौधरी आणि पश्चिम विभागासाठी प्रतिक म्हात्रे, रितेश तिवारी, संकेत गोवारी, अभिषेक जैन, अभिषेक नाईक यांची वर्णी लागली आहे. यावेळी, आरडीसीए तर्फे संघ निवडकर्ता म्हणून महाराष्ट्राचा माजी रणजीपटू पुष्कराज चव्हाण, योगेश पवार, उदय गद्रे, मैल्कम मोंटेरो यांनी काम पाहिले आहे. तर, मुख्य प्रशिक्षक म्हणून शंकर दळवी, संघ प्रशिक्षक म्हणून रवी सोलंकी व संघ व्यवस्थापक म्हणून सागर मुळे हे काम पाहणार आहेत.

जाहीर झालेला संघ पहिल्या दोन सामन्यासाठी खेळणार असून मंगळवार दि.३१ डिसेंबरपासून एमसीएच्या स्पर्धेत सहभागी होणार आहे. या स्पर्धेत रायगडच्या संघाला पाच टी-२० क्रिकेट सामने खेळायचे आहेत. तसेच, रायगडच्या संघाला आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदिप नाईक, सर्व पदाधिकारी व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

RAIGAD DISTRICT CRICKET ASSOCIATION
MEN'S T-20 TEAM

## वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

नामदेवशेठ येसु खैरे यांच्या स्मृतिदिनी शाळेचे वार्षिक पारितोषिक वितरण व शिक्षक सुरेंद्र अहिरराव सेवापूर्ती सोहळा शुक्रवारी (दि.२७) संत नामदेव माध्यमिक विद्यालय नांदगाव येथे संपन्न झाला. यावेळी, संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त व चित्रकला, रांगोळी व हस्तकला प्रदर्शनाच्या वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, नांदगाव विद्यालयात सुरेंद्र अहिरराव गेली ३१ वर्ष सहाय्यक शिक्षक म्हणून सेवा केली. त्यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुशीला खैरे, सुशीला अहिरराव, राजेश केणी, भारती शेळके, संविता हंबीर, समृद्धी यादव, जे.बी. गोळे, एकनाथ पडवळ, बळीराम निंबाळकर, वसंत शेळके, शांताराम सोनार, सुमेध खैरे, महेश जाधव उपस्थित होते.



# सिद्धेश्वर स्पोर्ट्स क्लब विजयी

**। खारेपाट । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील हाशिवरेच्या बालवीर संघाने राज्यस्तरीय क्रिकेट सामन्यांचे आयोजन केले होते. या स्पर्धा बालवीर मैदानावर पाच दिवस खेळवण्यात आल्या होत्या. यामध्ये रायगड जिल्ह्यासह राज्यातून ४० संघ सहभागी झाले होते.



या स्पर्धेत सिद्धेश्वर स्पोर्ट क्लब मांडवखार संघ प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला आहे. या संघाला नवी मुंबईचे तुळशी ट्रान्सपोर्ट प्रोप्रायटर तुळशीदास पाटील यांच्याकडून ७० हजार रुपयांचे पारितोषिक व चषक देण्यात आले. तसेच, एकविरा संघ थळ द्वितीय क्रमांकाचा मानकरी ठरला असून या संघाला ४० हजार रु. व चषक, बालवीर संघ हाशिवरे हा तृतीय क्रमांकांचा मानकरी ठरला असून या संघाला ३० हजार रु. व चषक देण्यात आले आहे. तर, वाघ्रण व परहूरपाडा संघाला प्रत्येकी २० हजार रु. व चषक देऊन गौरविण्यात आले आहे. या स्पर्धेत निखिल पाटील हा मालिकावीर ठरला आहे. त्याच्यासह अन्य खेळाडूंना आकर्षक बक्षिसे व चषक देण्यात आले.

पारितोषिक वितरण प्रसंगी तुलसीदास पाटील, स्मित पाटील माजी, सरपंच सिद्धनाथ पाटील, बालवीर मंडळाचे नंदकुमार पाटील व त्यांचे सर्व सहकारी, तसेच परमानंद पाटील, राजेंद्र बुधकर यांच्यासह पंचक्रोशीतील मंडळी व हजारोंच्या संख्येने रसिक प्रेक्षक उपस्थित होते.

## क्रॉस कंट्रीत श्रावणी प्रथम

**। उरण । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथे नुकत्याच जिल्हा स्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत उरण तालुक्यातील श्रावणी किरण केणी हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. उरण तालुक्यातील नागाव ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी किरण केणी यांची श्रावणी ही मुलगी आहे. तसेच, अमरावती येथे होणाऱ्या राज्य स्तरीय स्पर्धेसाठी श्रावणी केणी हिची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे सर्वच स्तरातून तिच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. श्रावणीच्या या यशात तिच्या आई-वडिलांचा महत्वाचा वाटा असून त्यांचेही सर्वत्र कौतुक होत आहे.



## हरियाणा स्टीलर्सचे जेतेपद

**। पुणे । प्रतिनिधी ।**

प्रो कबड्डी लीगच्या ११ व्या हंगामात हरियाणा स्टीलर्सने विजेतेपद पटकावले आहे. अंतिम सामन्यात हरियाणाने ९ गुणांनी बाजी मारली. हरियणाने सुरूवातीपासूनच पटना पायरेट्सवर वर्चस्व राखले. मागचे सलग दोन वर्ष अपयशी होणाऱ्या हरियाणा स्टीलर्स संघाने यावेळी मात्र ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे. पहिल्या सत्राचा खेळ अंत्यत चुरशीचा झाला. हरियाणा संघाने शेवटच्या मिनिटापर्यंत पटणावर वर्चस्व राखले आणि सामना ३२-२३ गुणांनी जिंकत प्रो कबड्डी ११ व्या हंगामाच्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले.

## संकेत म्हात्रेची भरीव कामगिरी

**। पेण । प्रतिनिधी ।**

कोकण परिक्षेत्रिय क्रीडा स्पर्धा दि.२४ व २५ डिसेंबर रोजी पालघर येथे पार पडली. पोलिस खात्याकडून दरवर्षी या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेमध्ये मोरा सागरी पोलिस स्टेशनचे जलतरणपट्टू संकेत केशव म्हात्रे याने भरीव कामगिरी करत पाच सुर्वण, एक रजत आणि एक कांस्यपदकं पटकाविले आहे.



यामध्येसिंधुदूर्ग,रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर या जिल्ह्यातील पोलीस खात्यातील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये जलतरण स्पर्धेमध्ये पेण तालुक्यातील पाटणेश्वर येथील रहिवासी व मोरा सागरी पोलीस स्टेशनचा पोलीस हवालदार संकेत म्हात्रे याने जलतरणच्या ५० मीटर फ्री स्टाईल, ५० मीटर बॅक स्ट्रोक, १०० मीटर फ्री स्टाईल, १०० मीटर बॅक स्ट्रोक व २०० मीटर आयएममध्ये सूवर्णपदक पटकावले आहे. तसेच, ४ बाय १०० मीटर फ्री स्टाईल रीलेत रजत, तर ४ बाय १०० मीटर आयएम रीलते कांस्यपदक पटकाविले आहे. त्याच्या या यशाबद्दल मोरा सागरी पोलिस स्टेशनच्या अधिकारी वर्गाकडून तसेच पाटणेश्वर ग्रामस्थांकडून अभिनंदन होत आहे.



## राजिप तळाशेत शाळेचे यश

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगांव तालुक्यातील ना.म. जोशी विद्याभवन गोरेगाव येथे तालुकास्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा मंगळवारी (दि.२४) पार पडल्या. या स्पर्धेत तळाशेत केंद्र शाळेने स्पर्धेत सहभाग घेऊन यश संपादीत केले आहे.

या स्पर्धेत तळाशेत शाळेने लहान गटातील समूह गायनात प्रथम क्रमांक, पथनाट्य व लंगडीत द्वितीय क्रमांक, शिल्पकामात सानिध्या सहस्त्रबुद्धे हिने तृतीय क्रमांक पटकावला आहे. तालुका स्तरीय परसबाग निर्मिती स्पर्धेत द्वितीय क्रमांक तळाशेत शाळेने मिळवलेला आहे.तसेच, लंगडी गटात शाळेतील ५ मुलींची तालुका संघात निवड झाली आहे. या उज्वल यशासाठी केंद्राचे केंद्रप्रमुख गणेश ढेपे, मुख्याध्यापिका भिंगारे, तसेच सर्व शिक्षक वर्गाने नियोजन करून सराव व मेहनत घेतली आहे.

### कुमार राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# रायगडच्या संघाची विजयी सलामी

**। सांगली । क्रीडा प्रतिनिधी ।**

**महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने, युवक मराठा मंडळाच्या सहकार्याने सांगली जिल्हा कबड्डी असो.ने ५१ व्या कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन सांगलीतील सांगलीवाडी येथील चिंचबाग मैदानावर करण्यात आले आहे. या स्पर्धेत यजमान सांगली, पुणे ग्रामीण, ठाणे ग्रामीण, पिंपरी-चिंचवड, रायगड, कोल्हापूर व परभणी संघांनी कुमार गटात विजयी सलामी दिली आहे.**

या स्पर्धेतील मुलांच्या उद्घाटनिय सामन्यातील 'ह' गटात सांगलीने नाशिक शहराचा प्रतिकार ४८-३३ असा मोडून काढला. २ लोण देत मध्यांतराला सांगलीने २८-१४ अशी आघाडी घेतली. नंतर मात्र नाशिककरांनी त्यांना बरोबरीची लढत दिली. पिंपरी-चिंचवडने चुरशीच्या लढतीत अहमदनगरला ३४-३१ असे रोखले. विश्रांतीला १३-१७ अशा पिछाडीवर असलेल्या पिंपरी-चिंचवडने विश्रांती नंतर जोरदार लढत देत ही किमया साधली आहे.

'फ' गटात रायगडने बीडवर ४६-३२ अशी शात केली. दोन्ही डावात एक-एक लोण देत आघाडी आपल्याकडेच कशी राहील याची दक्षता घेतली. 'क' गटात पुणे ग्रामीणने लातूरला ३१-१७ असे नमविले. दर्जेदार खेळाने पुणेकरांनी हा विजय साकारला. ठाणे ग्रामीणने चतुरस्त्र खेळाच्या जोरावर जळगांव संघाचा ५९-२१ असा पराभव केला. ठाणे शहरने नंदुरबार वर ३८-२२ असा विजय मिळविला. मध्यांतरापर्यंत चुरशीने खेळलेल्या या सामन्यात १४-१३ अशी ठाण्याकडे आघाडी होती.



'ड' गटात नंदुरबारने पहिल्या डावातील १७-१९ अशा पिछाडीवरून नांदेडला ४१-३१ असे रोखले. 'ब' गटात पिंपरी-चिंचवडने सातारा संघाला ६६-१८ असे लोळवित बाद फेरीतील आपला प्रवेश निश्चित केला. झंझावाती सुरुवात करीत ४ लोण देत ४८-११ अशी मोठी आघाडी घेत सातारची हवा काढून घेतली. अहमदनगरने औरंगाबादला ४३-१७ असे नमवित पहिल्या साखळी विजयाची नोंद केली. तसेच, 'अ' गटात मुंबई उपनगर पश्चिमने मुंबई शहर पश्चिमचा ५२-४६ असा पराभव केला. या दुसऱ्या पराभवाने मुंबई शहरचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)